नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

पसायदान (नवे) मेर्ढेकरांचे

भंगु दे काठिन्य माझे
आम्ल जाऊं दे मनीचें;
येउं दे वार्णीत माझ्या
सूर तूझ्या आवडीचे.

ज्ञान हेतूंतील माझ्या
दे गळूं मालिन्य, आणि
माझिया अज्ञात टाकी
स्फर्ति-केंद्रीं त्वद्‌बियाणीं.

राहुं दे स्वातंत्र्य माझें
फक्त उच्चारांतले गा,
अक्षरां आकार तूझ्या
फुफ्फुसांचा वाहुं दे गा.

लोभ जीभेचा जळूं दे
दे थिजूं विद्वेष सारा,
द्रौपदीचे सत्त्व माझ्या
लाभुं दे भाषा-शरीरा.

जाउं दे कार्पण्य 'मी' चें,
दे धरुं सर्वांस पोटीं;
भावनेला येउं दे गा
शास्त्र-काट्याची कसोटी.

खांब दे ईर्ष्ये स माझ्या
वाळगूं तुझ्या तपाचे;
नेउं दे तीतून माते
शब्द तूझ्या स्पंदनांचे.

त्वत्स्मृतीचें ओळखूं दे
माझिया हातां सुकाणूं;
थोर-यत्ना शांति दे गा
माझिया वृत्तीत बाणूं.

आण तूझ्या लालसेची,
आण लोकांची अभागी;
आण माझ्या डोळियांची
पापणी ठेवीन जागी.

धैर्य दे अन् नम्रता दे
पाहण्या जें जें पहाणें,
वाकुं दे बुद्धीस माझ्या
तप्त पोलादाप्रमाणे;

घेउं दे आघात तीतें
इंद्रिय-द्वारा जगाचे;
पोळुं दे आतून तीतें
गा अतींद्रियार्थ आचें.

आशयाचा तूंच स्वामी!
शब्दावाही मी भिकारी;
मागण्याला अंत नाही,
आणि देणारा मुरारी.

काय मागावें परी म्यां
तूंहि कैसें काय द्यावें;
तूंच देणारा जिथे अन्
तूंच घेणारा स्वभावें!!

अनुक्रमणिका

वर्ष ५८ अंक : चवथा

एप्रिल / मे / जून २००८

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक नारायण कुळकर्णी-कवठेकर

अनुक्रमणिका

युगवाणी (त्रैमासिक)

मुखपृष्ठावरील आणि अंकाची
अक्षरजुळणी
संजय आर. अन्नदाते, अकोला

मजकुराची मांडणी
विवेक रानडे

मुद्रण
नारायण ऑफसेट वर्क्स, धंतोली, नागपूर

या अंकाचे मूल्य चाळीस रुपये

वार्षिक वर्गणी १०० रुपये

प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक
नागपूर - ४४० ०१२.
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९

संपादकीय पत्रव्यवहार
नारायण कुळकर्णी कवठेकर
किताब, राऊतवाडी,
अकोला - ४४४ ००५
फोन ९८५०७४२८८१
ई-मेल
narayankulkarnik@gmail.com

अनुक्रमणिका

अ | नु | क्र | म

।। संपादकीय ।।

मर्ढेकर

पूर्ण नाव घ्यायला नको. चार अक्षरी आडनाव उच्चारले की एक उदास आणि भकास, तरीही जिवंत आणि दु:खी, अबोल आणि खुणावणारे असे दगडी शिल्प मराठी कवितेच्या एका दीर्घ वळणावर मैलाच्या दगडासारखे उभे दिसते. कवितांची संख्या जास्त नाही. (तेवढा तर आजच्या एखाद्या बहुप्रसव कवीच्या किरट्या कवितासंग्रहांचा आकडा असू शकतो.) कविता दीर्घ नाहीत. कडव्यांची संख्या जणू कोणी लिहू घातल्यासारखी. मुक्तछंद तर लिहायचाच नाही (इरेस पडलो तरी) अशी ठरवून प्रतिज्ञा घेतलेली. पहिला संग्रह आणि दुसरा संग्रह. जणू दोन कवींनी लिहिलेत असा भास व्हावा. मग कवीने परंपरेचा आकार घेतला; वृत्त आणि छंदाचे रूप घेतले आणि समकालीन अत्याधुनिक कल्लोळाशी त्याला एकरूप करण्याचा घाट घातला. अनुभूतीचा अस्सलपणा आणि कारागिरीतील कमाल कौशल्य यातून एक वेगळेच रसायन (ॲसिड?) तयार झाले. कवींच्या पुढील पिढ्यांना प्रभावित करणाऱ्या काही कवींमध्ये मर्ढेकरांचे नाव मोठे. नवकवी असे कुणी आज म्हणत नाही. पण या नवतेचे स्वरूप तपासण्याचे कार्य अनेक नवे लोक वेगळ्या दृष्टिकोनातून करत आहेत. स्त्रीच्या मातृरूपालाच श्रेष्ठ मानणारे मर्ढेकर. प्रत्येक वैयक्तिक आणि सामाजिक आणि वैश्विक समस्येच्या सोडवणुकीसाठी देवाचा धावा करणारे मर्ढेकर. विज्ञान, ज्ञान, संशोधन, प्रगती याकडे संशयाने पाहणारे मर्ढेकर. आणि माणसाच्या भौतिक दु:खाचे धागे वैश्विक आणि मूलभूत पेचांमध्ये मिसळून देणारे मर्ढेकर. नवता कोणती? आधुनिकता कोणती? पोथ्यांना विरोध पण देवापुढे शरणागती ! खूप आव्हाने देणारी आणि आतल्या गाठीच्या मर्ढेकरांच्या कवितेला शास्त्रकाट्याची कसोटी लावून भिडणे ही गरज अलीकडे पुन्हापुन्हा जाणवते आहे. नवे लोक नवतेचे आव्हान पेलतील अशी आशा करावयास काही हरकत नसावी.

।। तेथे कर माझे जुळती... ।।

। डॉ. विमल भालेराव

१९३७ साली मर्ढेकरांचा 'आर्टस् अँड मॅन' हा कलास्वरूपशास्त्राच्या सौंदर्यमीमांसेचा ग्रंथ लंडन येथून प्रकाशित झाला. १९३५ पासून 'सह्याद्री' मासिकात मर्ढेकर 'वाङ्‌मयीन महात्मता' ही कलावंताच्या कलानिर्मितीचा विचार मांडणारी लेखमाला चार भागात लिहीत होते. १९४१ साली 'वाङ्‌मयीन महात्मता' हे पुस्तक प्रकाशित झाले, त्याला सुप्रसिद्ध साहित्यिक व तत्त्वज्ञानाचे अभ्यासक वामन मल्हार जोशी यांची प्रस्तावना लाभलेली आहे. १९३७ ते १९५५ 'आर्टस् अँड मॅन' पासून 'सौंदर्यविचार' या लेखापर्यंत त्यांच्या सौंदर्यविचारात लयसिद्धांताद्वारे कलेत सौंदर्यभावना निर्माण होते, हे प्रमुख सूत्र दिसून येते. मर्ढेकरांचा 'सौंदर्य आणि साहित्य' हा ग्रंथ बीजग्रंथ आहे. या ग्रंथाच्या प्रेरणेने सौंदर्यमीमांसा, सौंदर्याचे व्याकरण, मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा, सौंदर्यानुभव, मर्ढेकरांचे साहित्यशास्त्र पुन:स्थापना, मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र पुनर्विचार, मर्ढेकरांचे साहित्यशास्त्र, मर्ढेकरांचे टीकाकार भ्रांत कोण, मर्ढेकरांची अनन्यता व मर्ढेकरांची महात्मता इ. ग्रंथांची निर्मिती झाली. मर्ढेकरांनी सर्व कलांचे प्रमुख लक्षण सौंदर्यमूल्य हे सांगितले. ललितकला इंद्रियसंवेदनांचा समग्राकृती, एकात्म व झटिती प्रत्यय देणाऱ्या, पण साहित्य कला ही प्रतिभांकित एकार्थ अर्थोत्पत्ती करणारी कला असल्यामुळे कलास्वरूपशास्त्रातील सौंदर्यमूल्याचे नाते सौंदर्यातून निर्माण होणाऱ्या विचाराशी जोडले. मर्ढेकरांचा साहित्यविचार कलावंतमुखाने, कलाकृतीमुखाने तर कधी रसिकमुखाने प्रगट झालेला आहे.

'वाङ्‌मयीन महात्मता' या लेखात मर्ढेकर कलानिर्मितीच्या अंगाने साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेविषयी आत्मचिंतन करीत आहेत. १९४१ साली 'वाङ्‌मयीन महात्मता' हा मर्ढेकरांचा निबंध, रामकृष्ण प्रकाशन मंडळ मुंबई यांनी प्रकाशित केला. या निबंधाला वा. म. जोशी यांची प्रदीर्घ प्रस्तावना असून वामन मल्हारांनी मर्ढेकरांच्या कलानिर्मितीच्या प्रक्रियेविषयी काही गंभीर शंका उपस्थित केलेल्या आहेत. मर्ढेकरांच्या 'वाङ्‌मयीन आत्मनिष्ठा' या निबंधावर नंतर अनेक समीक्षकांनी अनुकूल-प्रतिकूल टीका केली, पण या सर्व समीक्षकात वा. म. जोशी यांची टीका, सम्यक् व मूलगामी कलानिर्मितीच्या प्रक्रियेचा विचार करणारी आहे. मर्ढेकरांच्या सौंदर्यविचाराने जशी कलानिर्मितीचा व आस्वादाचा विचार करणारी प्रेरणा समीक्षकांना दिली तशीच प्रेरणा 'वाङ्‌मयीन आत्मनिष्ठा' या निबंधानेही दिलेली आहे. कुसुमावती देशपांडे, नरहर कुरुंदकर, रा. भा. पाटणकर, संभाजी कदम, म. द. हातकणंगलेकर, तर्कतीर्थ जोशी, रा. श्री. जोग, माधव मनोहर, सुधीर बेडेकर व द. भि. कुळकर्णी इ. समीक्षकांनी मर्ढेकरांच्या

'वाङ्मयीन महात्मता' संबंधी विविध प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत. या सर्व प्रतिक्रियांची गंगोत्री वा. म. जोशी यांनी 'वाङ्मयीन महात्मता'ला लिहिलेली विचार प्रवर्तक प्रस्तावना आहे; म्हणून वा. म. जोशी यांच्या प्रस्तावनेचा सम्यक दृष्टीने मराठी समीक्षकांनी विचार केला पाहिजे, तरच मर्ढेकरी सौंदर्य विचारावर प्रकाश पडू शकेल.

मर्ढेकर व वामन मल्हार हे जवळजवळ एकाच कालखंडातील सृजनशील कलावंत व समीक्षक. वामन मल्हारांचे १९४० साली 'विचार सौंदर्य' प्रकाशित झाले. हा वा. म. जोशी यांचा जवळजवळ शेवटचा लेख संग्रह तर 'वाङ्मयीन महात्मता' मर्ढेकरांचा पहिला मराठी वैचारिक निबंध, १९४१ साली प्रकाशित झाला. वामन मल्हारांची साहित्याकडे पाहण्याची दृष्टी कलाकृतीला साधन मानून सत्य, सौजन्य व सौंदर्य यांचा साहित्यातून आविष्कार शोधणारी, तर मर्ढेकरांची कलेकडे पाहणारी दृष्टी स्वयंभू साध्यरूप असून कला ही मानवी जीवनातील दैवी वरदान व श्रेष्ठ वरवाक्य असे मानणारी. या दोन स्वयंभू सर्जनशील कलावंतातील कलाविषयक दृष्टिकोणात फरक आढळला नाही तरच नवल. तरी नवकाव्याच्या प्रवर्तकाने व मराठीतील सौंदर्य विचाराची प्रथम वस्तुनिष्ठ उपपत्ती सांगणाऱ्या, मर्ढेकरांनी आपल्या 'वाङ्मयीन आत्मनिष्ठा' या निबंधाला वा. म. जोशी या विचारवंताची प्रस्तावना घ्यावी, यात मर्ढेकरांना वामन मल्हारांविषयी वाटणारा कडोविकडीचा आदर दिसून येतो. वामन मल्हारांनी 'वाङ्मयाची प्रवृत्ती व ध्येये' या निबंधात न. चिं. केळकरांच्या सविकल्प समाधीच्या उपपत्तीवर टीका करून, वाङ्मयापासून आनंद होण्याची ताटस्थ्याची भूमिका घेतली. मर्ढेकरांनीही रसिकांना लयतत्त्वाद्वारे सौंदर्यबोध होतो, असे प्रतिपादन केले. साहित्यातून प्राप्त होणारा आनंद हा लौकिकाभिन्न-अलौकिक स्वरूपाचा असतो, असे हे दोन्ही विचारवंताच्या विचारसरणीतील साम्य आहे. तरी वामन मल्हाराची भूमिका नीतिवादी तर मर्ढेकरांची कलेकडे पाहणारी दृष्टी स्वायत्ततावादी कलावादी आहे.

वामन मल्हार ज्ञानवादी व मानवतावादी 'महाराष्ट्राचे सॉक्रेटिस' होते. मराठीतील सुप्रसिद्ध समीक्षक गो. म. कुळकर्णी म्हणतात 'वामन मल्हारांना ग्रीक संस्कृतीतील ज्ञानवाद आणि मानवतावाद यांचे अभिजात आकर्षण होते. वा. मं. च्या वैचारिक चिंतनाचे स्वरूप इहवादी व मानवतावादी राहण्याचे हेही एक कारण असावे. ग्रीक संस्कृतीतील सौंदर्यवृत्ती मात्र वामन मल्हारांनी तेवढी आत्मसात केलेली आढळत नाही. (वा. म. जोशी साहित्यदर्शन साहित्य अकादमी, दिल्ली, प्रथम आवृत्ती १९८५-संपादक गो. म. कुळकर्णी. पृष्ठ १६)

मर्ढेकरांनी 'वाङ्मयीन आत्मनिष्ठा' या निबंधात कलेच्या स्वायत्ततावादी सौंदर्यमूल्याचा पुरस्कार करताना आपली जीवन भूमिकाही ढळू दिली नाही. आपल्या निबंधात मर्ढेकरांनी उगो आयोक्तीचे 'आत्मनिष्ठेत कलेची उत्पत्ती नसून परिणती आहे.' हे वाक्य उद्धृत केले. या वाक्याला मराठीतील समकालीन वाङ्मयनिर्मितीचा संदर्भ आहे. मर्ढेकरांना इटालियन व फ्रेंच या दोन्ही भाषा अवगत होत्या. मराठी वाङ्मयाला केवळ पाश्चात्य भाषेतील इंग्रजी प्रेरणाच कारणीभूत आहे. मराठी टीकाकारांची भिस्त फक्त एकाच भाषेतील टीकाकारावर विसंबून असल्यामुळे मराठी साहित्यात कल्पनात्मक प्रतिक्रियांचा साचेबंदपणा निर्माण झाल्यामुळे एक आवर्त निर्माण झाले. मराठी लेखक हृदयाचा भडका होऊन न लिहिता विचारांची बारीकशी काडी पेटवून लिहित असल्यामुळे त्यांच्या कल्पनात्मक प्रतिक्रियात जिवंतपणा शिल्लक उरलेला नाही. नव्या ज्ञानाचे आकलन नसल्यामुळे त्यांच्या भावनांना व विचारांना सजीव तीव्रता नाही. म्हणून मर्ढेकरांनी मराठी साहित्याचे यथायोग्य उचित निदान करून म्हटले की 'मराठी वाङ्मय इतके परपुष्ट आहे की ते पूर्णपणे परपुष्ट नाही' याचाच अर्थ ते एकाच इंग्रजी भाषेतून प्रेरणा घेत असल्यामुळे एकांगी झालेले आहे.

या ठिकाणी मर्ढेकरांनी उपयोजिलेले आत्मनिष्ठा

हे तत्त्व नैतिक किंवा धार्मिक स्वरूपाचे नसून ती कलावंताच्या मनाची कलानिर्मितीच्या वेळी झालेली जडणघडण आहे. वाङ्मयात (सिन्सिरिटी) आत्मनिष्ठेचा पुरस्कार कार्लाईलने केला. पण कार्लाईलची आत्मनिष्ठा म्हणजे एक नैतिक आचारतत्त्व आहे. हेन्री पायरनेही 'लिटरेचर इन सिन्सिरिटी' या ग्रंथात पाश्चात्य साहित्यशास्त्रात सिन्सिरिटी हा शब्द वेगवेगळ्या अर्थाने कसा उपयोजिल्या जातो, याचे सविस्तर विवेचन केलेले आहे. मर्ढेकरांच्या वाङ्मयीन महात्मता या लेखावर प्रा. रा. श्री. जोग यांनीही 'दक्षिणा' या लेख संग्रहात काही आक्षेप घेतलेले आहेत. या सर्व आक्षेपातील प्रमुख आक्षेप म्हणजे जोगांना मर्ढेकरांची आत्मनिष्ठेची संकल्पना नवीन वाटत नसून ती पाश्चात्य लेखकांनी पुरस्कारलेली जुनीच संकल्पना वाटते पण मर्ढेकरांनी प्रतिपादन केलेले आत्मनिष्ठेचे तत्त्व प्रेषित, धर्मसुधारक, राज्यशासक व साहित्यिक इत्यादीच्या क्षेत्रातील नैतिक आचारतत्त्व नसून ती कलावंताच्या मनातील आंतरिक अवस्था आहे.

"वाङ्मयातील आत्मनिष्ठा हे एखादे नैतिक आचारतत्त्व नसून ती एक मानसिक किंवा आंतरिक स्थिती आहे." मम (सौंदर्य आणि साहित्य पृ. क्र. १४५) या संदर्भात मर्ढेकरांनी उगो आयोत्ती या इटालियन लेखकाचे दिलेले अवतरण कलावंताच्या आत्मनिष्ठेच्या निर्मितिप्रक्रियेची अवस्था विशद करणारे आहे. मर्ढेकरांनीही उगो आयोत्तीला अभिप्रेत असणाऱ्या अर्थानेच 'सिन्सिरिटी' हा शब्द वापरलेला आहे. याबाबतीत डॉ. द. भि. कुळकर्णी यांचे विवेचन लक्षणीय आहे. वाङ्मयीन आत्मनिष्ठा हे बीज, वाङ्मयीन तादात्म्य हा त्या बीजाचा वृक्ष आणि वाङ्मयीन महात्मता हे त्या वृक्षाला आलेले फळ. या फळामध्ये बीज आहेच. निर्मात्याच्या मनातील सौंदर्यमूल्यभाव व प्रत्यक्ष विश्वघटना यांच्यातील विसंवादातून हा ग्रंथ १९६३ मध्ये पुढे लिहिला. या ग्रंथातील अर्थही मर्ढेकरांना अभिप्रेत नसून उगो आयोत्तीचेच अवतरण त्यांनी मुद्दाम दिलेले आहे. In arte la sincerita non e un hunto di hartenza, me un hunto di arrivo - Ugo Ojetti.

मर्ढेकरांच्या मते आत्मनिष्ठा म्हणजे सचोटी. 'महात्मता' हा शब्द त्यांनी भाववाचक नामापासून बनविलेला असून महात्मा या शब्दाशी त्यांचे कसलेही साम्य नाही. 'महात्मता' या शब्दातून मर्ढेकरांना नैतिक, धार्मिक किंवा पारमार्थिक मूल्यांचा आशय व्यक्त करायचा नसून ती कलावंताच्या मनाची विशिष्ट अवस्था अभिप्रेत आहे. "वाङ्मयातील आत्मनिष्ठा हे एखादे नैतिक आचारतत्त्व नसून ती एक मानसिक किंवा आंतरिक स्थिती आहे." (सौंदर्य आणि साहित्य – बा. सी. मर्ढेकर पृ. १४५) याचाच अर्थ वाङ्मयीन महात्मता या तीन अवस्था आहेत. आत्मनिष्ठा, तादात्म्य व कैवल्यपूर्ण मूल्यभाव या तीन अवस्थातून लेखन झाले तरच लेखनात वाङ्मयीन महात्मता निर्माण होते, असे मर्ढेकर म्हणतात. या वस्तुजातात व सृष्टीत लयतत्त्वामुळे सौंदर्य निर्माण होते. कलावंत जेव्हा या वस्तुजातातील घडलेल्या घटनेत किंवा प्रसंगात विसंवाद पाहतो, तेव्हा त्याच्या मनातील सौंदर्यमूल्याला तडा जातो व तो लेखनास प्रवृत्त होतो. वाङ्मयस्फूर्ती ही कलावंताच्या मनातील विसंवादातून निर्माण होते. "वाङ्मयीन आत्मनिष्ठा हे बीज, वाङ्मयीन तादात्म्य हा त्या बीजाचा वृक्ष आणि महात्मता हे त्या वृक्षाला आलेले फळ. या फळामध्ये बीज आहेच. निर्मात्याच्या मनातील सौंदर्य मूल्यभाव व प्रत्यक्ष विश्वघटना यांच्यातील विसंवादातून निर्मात्यास स्फूर्ती झाली होती. इथून वाङ्मयीन आत्मनिष्ठेस प्रारंभ झाला होता, त्या विवक्षित अनुभवातील लयसंबंध शब्दविष्कारमय अवस्थेत शोधण्याच्या क्रियेचे पर्यवसान संपूर्ण वाङ्मयीन तादात्म्यात झाले होते; आणि विश्वसंघटनेमध्ये आपल्या विवक्षित अनुभवाचे स्थान शोधून त्या अनुरोधाने आपला सौंदर्य मूल्यभाव परिवर्तित करून घेणे इथे वाङ्मयीन महात्मता सिद्ध होत होती; ज्या परिस्थितीने स्फूर्ती दिली ती परिस्थिती संपली म्हणून लेखन पूर्ण झाले, विश्वघटना आणि निर्मात्याचा सौंदर्यमूल्यभाव

यांच्या या सुसंवादामध्येच भावी स्फूर्तीचे बीज दडलेले आहे. (मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र: पुन:स्थापना- डॉ. द. भि. कुळकर्णी, पृ. ७१)

लेखनपूर्व आणि लेखनगर्भ आत्मनिष्ठा, ज्ञानात्मक आणि भावात्मक तादात्म्य व कैवल्यपूर्ण मूल्यभाव (लयबद्ध रचनासंबंध) या तीनही तत्त्वांचा एकात्म साकारल्याने कलाकृतीत एकजिनसी, अखंड समग्राकृतीने झटिती प्रत्यय लौकिकभिन्न अवस्थेत येतो, ही मर्ढेकरांची सम्यक् भूमिका वामन मल्हारांनी समजून घेण्याचा प्रयत्न केला असता, तर त्यांना मर्ढेकरांच्या कलानिर्मितिप्रक्रियेत जो फरक जाणवला तो त्यांना जाणवला नसता. पण असे व्हायचे नव्हते. वामन मल्हारांनी 'वाङ्मयीन आत्मनिष्ठा' या निबंधाला लिहिलेल्या दीर्घ व चिंतनशील प्रस्तावनेतून हा प्रांजळ मतभेद सौम्य व शांत प्रकृतिधर्माने प्रकट झालेला आहे. नेहमीच संशयात्मा व महाराष्ट्राचे सॉक्रेटिस समजल्या जाणाऱ्या, कारणामनेकतेचा सिद्धांत सांगून सत्याला अनेक पैलू असल्याचा विचार मांडणारे वामन मल्हार इथे मर्ढेकरांची कलानिर्मितीची त्यांनी विशद केलेली अवस्था पूर्णपणे समजून घेऊ शकले नाहीत; याबद्दल खंत वाटते. मर्ढेकरांच्या वेळी मराठी वाङ्मयात राष्ट्रवाद, गांधीवाद, मार्क्सवाद, आस्तिकवाद, कलावाद व तंत्रवाद बोकाळलेला होता. मर्ढेकरांपुढे डॉ. केतकर, न. चिं. केळकर, फडके, खांडेकर व सावरकर इ. साहित्यिकांचे कलाकृतीतील जीवनवादी, नैतिक दृष्टिकोणातून विचार करणारे साहित्य होते. कलेचा विचार साधन म्हणून करण्यात येत होता. या प्रक्रियेची मर्यादा मर्ढेकरांनी 'जीवनानुभवाच्या व्यापकतेचा अभाव' व 'कल्पनात्मक प्रतिक्रियांचा आवर्तपणा' या शब्दात व्यक्त केलेली आहे. याबाबतीत मर्ढेकरांची भूमिका वाङ्मयाच्या व्यापकपणापेक्षा त्याच्या सजीव तीव्रतेवर वाङ्मयीन महात्मता अवलंबून असते, अशी आहे. ही अनुभवव्यापकता अंतर्निष्ठ असली पाहिजे, अशी त्यांची अट आहे. आत्मनिष्ठा, ज्ञानात्मक किंवा भावात्मक तादात्म्यातून व कैवल्यपूर्ण मूल्यभावातून एक सेंद्रिय पातळीवरील जिवंत अनुभव व्यक्त होतो. साहित्यकलेत हा अनुभव लयबंधातून - भावानुभूतीच्या घाटातून व्यक्त होत असल्यामुळे एका इंद्रियसंवेदनेतून अनेक विचार व अनेक विचारातून एक इंद्रियसंवेदना फुलवण्याचे सामर्थ्य त्या भावानुभूतीत ज्ञानात्मक तादात्म्यामुळे असते. यासाठी मर्ढेकरांनी लुईजी पिरांदल्लो स्मृतीचित्रे गंगाधर गाडगीळ, किंग लियर व इलियटच्या साहित्यकृतींची उदाहरणे दिलेली आहेत. बालकवींच्या पारव्याचे उदाहरण देऊन मानवी जीवनातील खिन्न, नीरस व एकांत भाववृत्तीचे दर्शन घडविलेले आहे. 'राक्षसविवाह', 'व्याधाची चांदणी' इ. साहित्यकृतीत लेखनपूर्व व लेखनगर्भ आत्मनिष्ठेचा अभाव कसा आहे याचे विश्लेषण केलेले आहे. ''राक्षस विवाह ही एक भावकथा आहे; पण तिची भूमिका भावनाप्रधान नसून भावना व्यथित आहे. खरी प्रशंसनीय व आदरणीय भावनाप्रधानता ही तर्कशुद्ध विचारांच्या संगती-स्फूर्तीतून निर्माण होते. आणि मनुष्याला मानसिक सामर्थ्याची जोड करून देते...'' सामान्यत: मानसशास्त्राच्या आणि विशेषत: मनोगाहनाच्या अभ्यासाचा या मनोविश्लेषणात्मक भावकथेत तरी फारसा पुरावा सापडत नाही. (सौंदर्य आणि साहित्य पृ. २०४) असाच प्रकार गिरीशांच्या अभागी कमलामध्ये निसर्गवर्णनात व नायिकेच्या अंगकांतीच्या वर्णनात घडलेला आहे. प्रभाकर पाध्ये यांच्या 'व्यथाची चांदणी' मध्ये समृद्ध असा तर्कशास्त्रीयसाहचर्यसंबंध त्यांना लेखनगर्भ आत्मनिष्ठा व ज्ञानात्मक तादात्म्य यांच्या अभावी क्षीण जाणवला. ''श्री. पाध्ये यांचा कथासंग्रह म्हणजे कोवळ्या कल्पना आणि टपोर भावना यांचा एक आल्हाददायक बगीचा आहे. या बगिच्याची जमीन जुन्या आठवणी आणि ओला स्वप्नाळूपणा यांनी रुजविलेली आहे. पण श्री. पाध्ये यांच्या इतर लिखाणातून दिसून येणाऱ्या तर्कबुद्धीचा सूर्यप्रकाश या बगिच्यावर फारसा न पडल्याने त्याची जमीन गुळगळीत पण ठिसूळ झाली आहे; आणि त्यातील पानांफुलांवरील तकाकीला

अनुक्रमणिका

चैतन्याची छटा जरा कमी झाली आहे'' (सौंदर्य आणि साहित्य पृ. २०७)

वरील सर्व विवेचनावरून मर्ढेकरांना कलाकृतीतील भावानुभव हा प्राथमिक उद्रेकासारखा कलाकृतीत व्यक्त होतो, असे म्हणावयाचे नसून आत्मनिष्ठेतून- ज्ञानात्मक व भावात्मक तादात्म्यातून- कैवल्यपूर्ण मूल्यभावाच्या पातळीवर व्यक्त होतो असे म्हणावयाचे आहे. मर्ढेकरांच्या व वामन मल्हारांच्या कलानिर्मितीसंबंधीच्या विचारात एक आंतरिक साम्य आहे. हे साम्य पूर्णपणे वा. म. जोशी यांनी समजून न घेतल्यामुळे, आत्मनिष्ठा म्हणजे वाटेल ते उत्फूर्तपणे लिहिणे, असा अपूर्ण अर्थ घेतलेला आहे. वा. म. जोशी म्हणतात 'वाङ्मयातील स्वानुभूती, आत्मप्रतीती म्हणजे sincerity (जिलाच मर्ढेकर आत्मनिष्ठा म्हणतात) काय चीज आहे.' याविषयी मर्ढेकरांचे आणि विशिष्ट बाबतीपुरतेच मतैक्य आहे. मतभेद कोठे व कितपत आहे, हे एकदम इथेच सांगण्यापेक्षा वाङ्मयातील स्वानुभूतीच्या अविष्कारासंबंधी माझी जी मते आहेत ती सांगण्याचा प्रयत्न करतो. म्हणजे ओघाओघानेच आणि अप्रत्यक्षपणे मतैक्य आणि मतभेद दिग्दर्शित होतीलच. वा. म. जोशी साहित्यदर्शन (संपा. गो. म. व वा. ल. कुळकर्णी पृ. १२१) यासंदर्भात वा. म. जोशी यांनी वाल्मिकीच्या 'मा निषाद' या श्लोकाला मी कलाकृती म्हणणार नाही. नळावरील अडाणी स्त्रियांच्या भांडणाला व निसर्गाला कलाकृती म्हणणार नाही. कारण ती प्रतिक्षिप्त क्रिया आहे. कलावंताची प्रतिभेची स्वाभाविकता ही प्रतिक्षिप्त (Reflex action) किंवा सहजप्रेरणेमधील स्वाभाविकतेसारखे नसते, असे त्यांचे मत आहे. त्यांच्या मते कलाकृतीतील प्राथमिक स्वरूपातल्या अनुभवावर काही बुद्धिपुरस्सर संस्कार व्हावे लागतात. त्या स्वानुभवाकडे विशिष्ट दृष्टीने पहावे लागते. वामन मल्हारांच्याच शब्दात सांगायचे तर 'कलाकृतीतील स्वानुभव प्राथमिक नसून रूपांतरित, स्मरणोज्जीवित, छायात्मक मननात्मक असतो आणि या अर्थाने तो सहजस्फूर्त नसून संस्कारजन्य असतो' मर्ढेकरांच्या वाङ्मयीन आत्मनिष्ठा, वाङ्मयीन ज्ञानात्मक- भावात्मक तादात्म व कैवल्यपूर्ण मूल्यभाव ही तीन स्वतंत्र तत्त्वे नसून कलावंताच्या निर्मितीच्याक्षणी ती समग्राकृतीने एकवटून आविष्कृत होतात, असे स्पष्टपणे सांगितलेले असतांना मर्ढेकर सहजप्रेरणातील स्वाभाविकता कलेची प्रेरणा मानतात व स्वतःला जे बरोबर वाटते ते लिहिणे ही वाङ्मयीन यशाची पहिली पायरी मानतात, एवढ्याच विवेचनावर वा. म. जोशी यांनी थांबावे व मर्ढेकरांच्या आत्मनिष्ठा व तादात्म्य व कैवल्यपूर्ण मूल्यभावातून महात्मता निर्माण होते, हे साकल्याने समजून घेऊ नये, याबद्दल असमाधान वाटते.

वा. म. जोशी यांची कलेकडे पाहण्याची भूमिका मर्ढेकरांप्रमाणे अलौकिकवादी असूनही, कलेची फलश्रुती प्रतीतीविश्रांतीत होत असते; अशी ही प्रत्यभिज्ञादर्शनाची प्रक्रिया वा. म. जोशी यांना ज्ञात असूनही त्यांनी 'वाटले ते लिहिले' हे कितपत बरोबर असा प्रश्न मर्ढेकरांच्या आत्मनिष्ठेविषयी विचारावा, याचे आश्चर्य वाटते. मर्ढेकरांना कलावंताने आपल्या अनुभव विश्वाशी प्रामाणिक राहून ज्ञानात्मक किंवा भावात्मक तादात्म्यातून, कैवल्यपूर्ण मूल्यभावातून - आंतरिक अनुभवातील लयबंधातून सौंदर्यनुभूती व्यक्त करावी, असे प्रतिपादन केलेले आहे. केवळ शारीर इंद्रियसंवेदना व्यक्त होतांना त्या जीवशास्त्रीय पातळीवरून व्यक्त न होता सौंदर्यानुभूतीच्या घाटातून, प्रतीतीविश्रांतीच्या पातळीवर कलेत व्यक्त होत असतात. उदा. केवळ शारीरिक संवेदनात लयबंधातून व्यक्त होतांना पु. शि. रेगे यांच्या कविता भावानुभव किती उत्कट व आर्त सौंदर्यानुभव म्हणून साकार होत असतो. ज्ञानात्मक तादात्म्यातून पु. शि. रेगे त्रिधा राधा, शहनाज, अदिती या कवितेतून एक संद्रिय जीवनार्थसूचक विश्वव्यापी अनुभव व्यक्त करतात.

आकाश निळे तो हरी
अन एक चांदणी राधा
बावरी

युगायुगिची मन-राधा
विस्तीर्ण भुई गोविंद
अन क्षेत्र साळीचे राधा
स्वच्छंद
युगायुगिची प्रियंवदा
जलवाहिनी निश्चल कृष्ण
बन झुकले काठी राधा
विप्रश्न
युगायुगिची चिर-तंद्रा

शारीर-संवेदनांची उत्कटता सौंदर्यानुभूतीचा आंतरिक लयबद्ध आकृतीतून आविष्कृत झाली, तर तिच्याही अलौकिक सौंदर्यभावना निर्माण होते ते भावात्मक तादात्म्यामुळे.

लंपट ओले वस्त्र होऊनी
अंग अंग तव लिंपून घ्यावे
हुळहुळणारे वस्त्र रेशमी
होऊन वरवर घोटाळावे
भुईवर निखळून नवख्यापरि तुज
दुरून रात्री तसे पहावे पहाट होता पश्मीन्याची
शाल होऊनि तुज छपवावे.

लौकिकवादी कलादृष्टीत जीवशास्त्रीय भावनेतून कृतिशीलता अभिप्रेत असते, तर अलौकिकवादी प्रत्यभिज्ञेत सौंदर्यप्रतीतीविश्रांती, हा भेद लक्षात घेऊन वा. मं. नी मर्ढेकरांच्या आत्मनिष्ठा या संकल्पनेचा एक अवस्थाभेद म्हणून विचार केला असता तर ''वाटेल ते लिहिणे, कितपत बरोबर'' असा प्रश्नच त्यांना पडला नसता.

माधव ज्यूलियनांवर मर्ढेकरांची एक अप्रतिम सुंदर कविता आहे. माधव ज्यूलियनांनी मर्ढेकरांच्या 'शिशिरागम' या कविता संग्रहावर सह्याद्री जून १९३९ च्या अंकात उत्कृष्ट समीक्षणही लिहिलेले होते, असे असतानाही मर्ढेकरांनी 'हे काय असे होई' या गझलेत लेखनगर्भ आत्मनिष्ठा नाही असे म्हटले ते आपल्या आत्मनिष्ठा. तादात्म्य व कैवल्यपूर्ण मूल्यभावाच्या तात्त्विक दृष्टिकोनातून त्यांच्या सौंदर्यभावनेच्या पातळीवर तिच्यातील आत्मनिष्ठा त्यांना तर्कशुद्ध मानसशास्त्रीय अवस्थेचा विकास वाटला नाही म्हणून. वा. मं. नाही या कवितेत मूळ अभिप्रेत भावनेत बहुमूल्यता असली तरी रसिकाला सौंदर्यप्रत्यय देण्यासाठी उपयोजलेली अन्योक्तिरूपे व प्रतीके औचित्यपूर्ण नाहीत असे जाणवले. अनंत काणेकर यांचे 'कोळ्यांचे गाणे' व यशवंताच्या 'माहूतास' या दोन्ही कवितात अल्पदोष आहेत. पण ''प्राधान्येन व्यपदेशा भवन्ति'' या न्यायानुसार त्यांना ते गौण वाटले. मर्ढेकरांना मात्र ते प्रधान दोष वाटले. हा शेवटी प्रत्येकाच्या दृष्टिकोणाचा फरक आहे. यालाच प्रमाणांचा रक असून प्रकाराचा तो नाही, असे म्हणू. वा. म. जोशी यांनी अनंत काणेकरांची 'कोळ्याचे गाणे' या कवितेच्या निर्मितिप्रक्रियेसंबंधी मुंबई रेडीओवर स्वत: काणेकरांच्या भाषणाची साक्ष काढून कवीला फक्त जानपद भाषेचा आभास निर्माण करावयाचा होता असे सांगितले ते औचित्यपूर्ण वाटत नाही. एकदा कलाकृती निर्माण झाल्यावर, तिच्यासंबंधी समीक्षकांनी आपापल्या दृष्टिकोणातून व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया मूळ कलाकृतीतील सौंदर्यानुभव विशद करीत असतात. अशा आस्वादातून कलाकृतीचे अवमूल्यन न होता, तिच्यातील घाट-लयबंध, तिच्यातील अंत:सत्वाने द्रौपदीच्या सत्त्वासारखा अधिकाधिक उजळून निघत असतो. उदा. बालकवींचा औदुंबर, बींचा चाफा, रणांगण, रथचक्र, धग, ज्ञानदेवांच्या व तुकारामांच्या साहित्यकृती. कलावंताच्या मनात एक सौंदर्यसंबोध असतो. विश्व हे लयतत्त्वाचा आविष्कार असल्यामुळे विश्वातील सर्व वस्तू व अनुभव यांची संगती व प्रतवारी लयतत्त्वाद्वारे लावता येते. कलावंताची भावनासंगती व विश्वघटनासंगती यांची एकवाक्यता फक्त परमेश्वराच्या किंवा सर्व विश्वाशी समव्याप्त असलेल्या संज्ञाशक्तीच्या बाबतीत शक्य आहे. लयतत्त्व हा विश्वव्यापी चैतन्यतत्त्वाचा संवाद, विरोध व समतोल या संबंधाचा आविष्कार आहे. कलावंताच्या मनातील सौंदर्यसंबोधाला धक्का बसला पाहिजे असा नियम नाही असे सांगून मर्ढेकरांनी

अनुक्रमणिका

सांगितलेल्या निर्मितिप्रक्रियेलाही वा. म. जोशी यांनी विरोध दर्शविलेला आहे. "पण अशाच प्रकारचा धक्का बसलाच पाहिजे, असे शास्त्र नाही." (प्रस्तावना वाङ्मयीन महात्म्यता - वा. म. जोशी) कलावंताला आपला सौंदर्यानुभव नाम, रूप, स्थल-कालादि मूर्त-अमूर्त उपाधींच्या सहाय्याने व्यक्त करावा लागतो. वा. म. जोशी यांना काणेकर व यशवंत यांच्या कवितेत दिसणारे दोष उपाधीविषयक गौण व क्षम्य आहेत, असे वाटते. मर्ढेकरांना मात्र आत्मनिष्ठा व ज्ञानात्मक तादात्म्याच्या अभावी हे दोष निर्माण झाल्यामुळे प्रधान स्वरूपाचे वाटतात. मर्ढेकरांनी ज्ञानात्मक व भावात्मक तादात्म्यामुळे जीवनमूल्यांच्या भावनानुभवातील अर्थाला लयतत्त्वाद्वारे आकृतीरूप मिळते असे प्रमेय सांगितले. साहित्यनिर्मितीत ज्ञानशक्तीला व तर्कशक्तीला मर्ढेकरांनी महत्त्वपूर्ण स्थान दिलेले आहे. "लेखकाच्या इंद्रियसंवेदनांची इतिकर्तव्यता त्या संवेदनांच्याच परिपूर्ण आकलनात नसते. ते ध्येय इतर कलावंताचे असते. पण लेखकाच्या तीव्र जाणिवेचा उत्कर्ष निरनिराळ्या इंद्रियसंवेदनांनी सुचविलेल्या विचारांच्या विपुलतेत होतो. पिकलेल्या पानांचा पिवळा रंग पाहून फक्त पिवळ्या रंगाचेच भान राहाणे हे उत्कृष्ट चित्रकाराचे लक्षण आहे. पण त्या पिवळ्या रंगाने परिणतावस्थेबद्दल आदर, कीव, निराशा, दुःख, उदात्त समाधान या किंवा इतर अनेक विचारांच्या कोलाहलाने मन एका निःशब्द आतुरतेने भरून जाणे ह्यात कवीच्या किंवा लेखकाच्या 'तीव्र जाणिवेची परिसमाप्ती आहे.

लिखाणाचा दर्जा इंद्रियगोचर वैचित्र्यापेक्षा इंद्रियज्ञानाने स्फुरलेल्या विचारांच्या विविधतेवर अवलंबून असतो. लेखक इंद्रियसंवेद्य अनुभवाशी तादात्म्य पावला किंवा नाही याची खरी कसोटी इंद्रियसंवेदनावर फुललेल्या विचार मालिकेत आहे. (सौंदर्य आणि साहित्य पृ. १५९ वा. सी. मर्ढेकर) वा. मं. नी मर्ढेकरांनी दिलेला वाल्मिकीचा 'मा निषाद. ' हा लोक घेतला पण दिवसेंदिवस त्या दृश्यावर विचार करीत मग्न राहिल्यावरच लेखक त्याच्याशी समरस होऊ शकतो, या मर्ढेकरांच्या वाक्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. वा. म. म्हणतात तसाच मर्ढेकरही कलेतला अनुभव, प्राथमिक नसून रूपांतरित स्मरणोज्जीवित, छायात्मक व मननात्मक मानतात. "लेखकाच्या बुद्धिभावनांना जर एका मोठ्या खडकाची उपमा दिली, आणि त्या खडकाच्या पोटात शब्दगंगा गडप आहे असे धरले, तर काही वेळा आकाशातून कडाडत पडलेली वीज त्या खडकाला दुभंगून आतील शब्दगंगेला वाट फोडते, तर काही वेळा विचारांची संतत धार त्या खडकावर बराच वेळ पडल्यानंतर तो खडक हळूच फुटून त्यातील शब्दगंगेचा प्रवाह बाहेर येतो. संवेदना विचार, भावना यांची प्रखर जाणीवच ज्याला शक्य नाही तो वाङ्मयीन तादात्म्याला पारखाच राहणार. "(सौंदर्य आणि साहित्य - मर्ढेकर पृ. १६२)

वामन मल्हारांनंतर डॉ. रा. भा. पाटणकरांनी वाङ्मयीन आत्मनिष्ठेचे तत्त्व मर्ढेकरांच्या आकारवादी सौंदर्यशास्त्राशी सुसंगत नाही असे सांगितले. प्रा. म. द. हातकणंगलेकरांनी आशयप्रधान निकष मानण्यास मर्ढेकरांचा पराभव मानला. तर्कतीर्थ जोश्यांनी वाङ्मयीन महात्मतेचा भौतिक परिस्थितीशी संबंध जुळविला तर रा. श्री. जोगांनी आत्मनिष्ठा ही साध्य नसून साधन आहे, असे मत प्रतिपादन केले. माधव मनोहरांनी आत्मनिष्ठा म्हणजे स्वानुभवनिष्ठा असे तत्त्व गृहीत धरले तर सुधीर बेडेकरांनी आत्मनिष्ठा व महात्मता यांचा मेळ आकृतीवादी सौंदर्यमीमांसेशी बसत नाही, असे असमाधान व्यक्त केले. उपरोक्त सर्व प्रतिक्रिया मर्ढेकरांच्या अलौकिकवादी भूमिकेवरील हल्ला-प्रतिहल्ला आहेत. या सर्व आक्षेपांचे मूळ कलाकृतीकडे लौकिकवादी दृष्टिकोणातून पाहण्यात आहे. वास्तविक मर्ढेकरांची व वामन मल्हारांची कलानिर्मितीकडे व कलास्वादाकडे पाहण्याच्या भूमिकेत अंतःसूत्र आहे. दोन्ही प्रतिभावंत साहित्यिकांनी कलावंत व कलाकृती आणि कलाकृती व रसिक गृहीत धरलेला आहे. सौंदर्य वस्तुनिष्ठ असले तरी ते अनुभवनिष्ठच असते असे मर्ढेकरही म्हणतात. मर्ढेकर व वामन मल्हार यांच्या विचारांतील

साम्याचा शेवट डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्या विवेचनाने करू. ''मर्ढेकर वाङ्मयकलेतही कलावंताच्या आत्माविष्काराला महत्त्व देत नाहीत; तो ग्राह्य मानीत नाहीत: वाङ्मयीन आत्मनिष्ठा म्हणजे साहित्यिकाने स्वत:च्या अनुभवाशी प्रामाणिक राहणे नव्हे तर वाङ्मयरूप धारण करू पाहणाऱ्या अनुभूतीशी प्रामाणिक राहणे; तादात्म्य म्हणजे साहित्यिकाने स्वत:च्या अनुभवाशी समरस होणे नव्हे तर वाङ्मयरूप धारण करू पाहणाऱ्या अनुभूतीशी भाषाविष्कारनिष्ठ व लयनिष्ठ समरस होणे व महात्मता म्हणजे वाङ्मयकृतीत आकारनिष्ठ लय निर्माण करणे नव्हे तर कलावंताने आपल्या वैश्विक-सौंदर्यकल्पनेशी विशिष्ट वाङ्मयकृतीतील अनुभूतीची लयनिष्ठ - सौंदर्यनिष्ठ सांगड घालणे.'' (मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र पुन:स्थापना - पृ. क्र. १८०)

❑❑❑

वर्गणीदारांसाठी सूचना

१. 'युगवाणी'चे अंक मिळण्यासाठी वर्गणीदारच व्हावे हे उत्तम.
२. वर्गणी फक्त मनीऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्टने ('विदर्भ साहित्य संघ' या नावाने) स्वीकारण्यात येईल.
३. सध्या, वर्गणी फक्त एका वर्षाची स्वीकारण्यात येईल.
४. वर्षाच्या मधल्या अंकापासून वर्गणीदार झालेल्यांना आधीच्या अंकाच्या प्रती शिल्लक असल्यास पाठवणे शक्य होईल.
५. वर्गणी पाठविताना आपले नाव, संपूर्ण पत्ता, पिन कोड आणि फोन नंबरही कळवावा.
पत्ता :- १. 'किताब', राऊतवाडी, अकोला - ४४४००५
२. विदर्भ साहित्य संघ, झाशीराणी चौक, सीताबर्डी, नागपूर - ४४००१२.

।। काव्यनिर्मितीप्रक्रिया : तीन संदर्भ ।।

। प्रा. अजय देशपांडे

भूमी, स्त्री आणि कलावंताचे मन या तिन्ही शक्तींच्या ठायी सृजनशीलता असते. भूमी, स्त्री आणि कलावंतांच्या मनातील सृजनशीलतेचे परस्परांशी आदिम नाते आहे. या तिन्ही शक्तींच्या सृजनशीलता बीजसंभवती आणि बीजसंगोपक असतात. भूमी आणि स्त्रीच्या सृजनशीलतेशी कलावंताच्या सृजनशील निर्मितिक्षमतेचे अनुबंध जुळलेले असतात. खरे तर भूमितत्त्व आणि स्त्रीतत्त्व निर्मितीचे प्रतीक म्हणूनच कलावंताच्या सृजनशीलतेला आवाहक आणि प्रेरक ठरत असते. भूमीच्या, स्त्रीच्या सृजनशक्तीच्या आविष्कारात अनेकदा प्रतिभावंताला निर्मितिप्रक्रियेची अनवट सूत्रे गवसतात. भूमी आणि स्त्रीच्या सृजनशीलतेशी तादात्म्य पावलेल्या कलावंताला त्याच्या बीजसंभवती मनातील काव्यनिर्मितीचा लावण्यसोहळा न्याहाळता येत असतो.

॥ १ ॥

तुकारामांनी अनेक अभंगांमध्ये सृष्टितत्त्वाचा, भूमितत्त्वाचा आणि मातृत्वाचा गौरव केला आहे. माता, पिता, कन्या, पुत्र यांच्या आदिबंधात्मक प्रतिमांमधून तुकाराम सृष्टितत्त्वांशी तादात्म पावण्याचा प्रयत्न करतात. भूमीच्या सृजनात्मकतेशी स्त्रीच्या सृजनशीलतेचे नाते लोकप्रतिभेने अनादी काळापासून जोडलेले आहे, लोकप्रतिभा या आदिम नात्याचा गौरवही करते. तुकाराम आपल्या कवितेत भूमी आणि स्त्रीच्या सृजनशीलतेचा उच्चार करतात. माता आणि अपत्य यांचा आदिबंध संत कवींच्या अनुभवात प्रतीत होण्याची प्रक्रिया आदिम लोकप्रतिभेतील लोकगीतांतूनच संक्रांत झालेली आहे. माता आणि मूल, माहेर आणि मुलगी, पाणी आणि मासोळी, माता आणि गर्भ अशी अनेक रूपे तुकारामांनी सृष्टितत्व आणि मानव यासंदर्भात उपयोजिली आहेत. तुकारामांची विश्वजाणीव सृष्टी आणि मानव यांच्या एकत्रित जीवन संवर्धनाला कवेत घेणारी आहे. सृष्टी, स्त्री आणि कवीची प्रतिभा यांच्या ठायी सृजनशीलता असते. काव्यनिर्मितीच्या सोहळ्याचे सृष्टी, स्त्री यांच्या सृजनशीलतेशी अनुबंध असतात, अशी धारणा लोकप्रतिभेप्रमाणेच तुकारामांचीही होती. काव्यनिर्मितिप्रक्रिया तुकाराम अनेक अभंगांमधे उकलून दाखवितात. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' हा अभंग या संदर्भात लक्षणीय आहे.

आनंदाचे डोही आनंदतरंग
आनंदचि अंग आनंदाचे ॥१॥
काय सांगो जाले काहीचियाबाही
पुढे चाली नाही आवडीने ॥२॥
गर्भाचे आवडी मातेचा डोहळा
तेथीचा जिव्हाळा तेथे बिंबे ॥३॥
तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा
अनुभव सरिसा मुखा आला ॥४॥

माता-मूल संबंधाच्या मुशीत तुकाराम सृष्टितत्त्वाची आळवणी करतात. मातृकोश जन्मापूर्वी

गर्भाला आणि जन्मानंतर अपत्याला जीवन संवर्धक वाटतो, तसेच पृथ्वी, आप, तेजवायू आणि आकाश ही महान सृष्टितत्त्वे मानवाला जन्मापूर्वी आणि जन्मानंतरही आयुष्यभर जीवन संवर्धकच ठरतात. तुकाराम आपले अस्तित्व सृष्टितत्त्वाच्या अनादी अनंत अस्तित्वाशी जोडून व्यापक निसर्गजाणीवेशी-विश्वजाणीवेशी तादात्म्य पावलेले आहेत.

'गर्भाचे आवडी मातेचा डोहळा । तेथीचा जिव्हाळा तेथे बिंबे ॥' या ओळीतील आशयाचे बीज अभंगाच्या केंद्रस्थानी आहे. उदरातल्या गर्भाची आवड मातेद्वाराच पूर्ण होत असते, मासोळीचा मातृकोश म्हणजे पाणी, पर्यायाने एक महान सृष्टितत्त्व. गर्भाचा मातृकोश म्हणजे गर्भाशय, पर्यायाने माता. गर्भाशयातील 'जीवन' म्हणजे गर्भाचे जीवन होय, गर्भातल्या जीवाच्या आवडीचे रूपस्वरूप मातृजिव्हेवर प्रकटत असते, हा गर्भाचा मातेप्रती आणि मातेचा गर्भाप्रती असणारा उत्कट जिव्हाळा आहे. हा जिव्हाळा आनंद सोहळ्याची उत्कट अनुभूती देणारा आहे, सृजनशीलतेची उत्कट अनुभूती देणारा आहे. ही आशयानुभूती केंद्रस्थानी ठेवली की अभंगाचा रूपबंध आशयाच्या पाकळ्यापाकळ्यांनी उलगडत जातो.

पहिल्या दोन ओळींमध्ये आनंद हा शब्द चार वेळा आला आहे. तो पाण्यावरच्या तरंगासारख्या अवस्थेची प्रतीती देणारा आहे. पाण्याच्या पृष्ठभागावर जेव्हा तरंग उठतात, तेव्हा पाण्याच्या अंतरंगात काहीतरी घडले असते डोहातल्या हालचालींचे-तरंगाचे पृष्ठभागावरही तरंग उमटतात, आणि तरंगातून अनेक तरंग उमटत राहतात. चेहऱ्यावर आनंदाचा तरंग मनातल्या आनंदामुळे येत असतात. मानवी मन थांगपत्ता न लागणाऱ्या डोहासारखे असते. मनातल्या आनंदाचे तरंग चेहऱ्यावर, हावभावांवर, डोळ्यांमध्ये आणि शब्दांमध्येही उमटत असतात. उदरातल्या गर्भाच्या आवडीचे तरंग मातेच्या जिव्हेवर उमटत असतात. पण मातेच्या सृजनात्मक आनंदाचे विश्व शब्दात सांगता येत नाही, ते शब्दातीत आहे. आनंद हा अनुभवावा लागतो, तो शब्दात सांगण्याचा प्रयत्न केला तर 'काहीचियाबाही' असे होते. जसा मातेच्या उदरातील गर्भ हा मातेच्या जीवनसत्वावर जिवंत असतो. तसा पृथ्वी, आप, वायू, तेज, आकाश यांच्यातील जीवनसत्वांमुळेच माणूस जिवंत असतो.

तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा ।
अनुभव सरिसा मुखा आला ॥

या ओळींमधील 'तैसा' हा शब्द वरच्या ओळीतील आनंद सोहळ्याच्या संदर्भात आणि 'तेथीचा जिव्हाळा तेथे बिंबे' या ओळीच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. तुकारामांनी या शेवटच्या दोन ओळींमध्ये आपल्या काव्यनिर्मितिप्रक्रियेचा अनुभव विशद केला आहे. सृष्टितत्त्वातील सृजनशीलतेचे मानवी प्रतिभेतील सृजनशीलतेशी नाते आहे. भूमीप्रमाणेच सृजनशीलतेशी नाते आहे. भूमीप्रमाणेच पाण्याचे ठायीही सृजनशीलता आहे. भूमी, पाणी आणि स्त्री यांना माता म्हटले जाते. भूमी, पाणी आणि स्त्री यांच्या ठायी असणारी सृजनशीलता कवीच्या ठायी देखील असते. सृष्टितत्त्वातल्या सृजनशीलतेचे अनुबंध जसे मातृत्वाशी जुळले असतात तसेच ते कविमनाशीही जुळलेले असतात. सृष्टी आणि स्त्रीतील सृजनशीलतेचे तत्त्व आपल्या कविमनात असल्याचा अनुभव तुकारामांना येणे हा शब्दातीत आनंद सोहळा आहे. 'अनुभव सरिसा' या शब्दात सृष्टी आणि स्त्रीच्या सृजनशीलतेच्या अनुभवासारखा अनुभव म्हणजे आपली कविता होय, असेच तुकाराम सुचवितात.

सृष्टी आणि स्त्रीच्या सृजनशीलतेशी आपल्या काव्य निर्मितिप्रक्रियेचे उत्कट नाते आहे. गर्भाच्या आवडीचा डोहाळा जसा मातेच्या जिव्हेवर येतो, तसा मनाच्या डोहातील भावनांचा तरंग कवीच्या ओठावर येतो. ही प्रक्रिया - हा सोहळा निखळ आनंदाचा आहे, पण शब्दातीत आहे. मातृत्वाचा सोहळा, काव्यनिर्मितीचा सोहळा शब्दातीत असतो, काव्यनिर्मितीची अनुभूती शब्दात सांगता येत नाही, पण त्याची परिणती- कविता थेट मुखी - ओठावर येते. तुकारामांचा हा अभंग काव्यनिर्मितिप्रक्रियेची

शब्दातीत अनुभूती व्यक्त करणारा आहे.

॥ २ ॥

ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि ह्या मातीतुनी चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लखडून जावे

ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि माझ्या पापणीला पूर यावे
पाहता ऋतुगंध कांती सांडलेली
पाखरांशी खेळ मी मांडून गावे

गुंतलेले प्राण ह्या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुनी बेहोष होता
शब्दगंधे, तू मला बाहूत घ्यावे ।

ना. धों. महानोर यांची ही कविता सृजनाच्या उत्सवाची कविता आहे. पाऊस येणे, भुईवर नवे अंकुर फुटणे आणि मनात कविता फुलणे असा नवनिर्माणाचा जन्मसोहळा या कवितेत रंगला आहे. 'ह्या नभाने भुईला दान द्यावे' या निसर्गातील सृजनात्मक घटनेत मोठे काव्य दडले आहे. 'आणि ह्या मातीतुनी चैतन्य गावे' ही ओळ भूमीच्या सृजनशीलतेचा गौरव गाणारी आहे. नभ आणि माती यांच्या सृजनाचे नाते पुरुष आणि स्त्री यांच्यातील नात्यासारखेच असल्याचे योजून आदिम काळापासून आजतागायत लोकप्रतिभा मुक्तकंठाने गात आहे. नभ आणि भूमीच्या मीलनाचा सोहळा म्हणजे पाऊस. या पावसाच्या अनंत रूपांमध्ये अनादी कालापासून लोकप्रतिभेला काव्य निर्माणाचे बीज गवसले आहे. 'नभाने भुईला दिलेले दान निर्मितीचक्र घडवून आणते. मातीतून 'चैतन्याचे' गाणे गायले जाते. जोंधळे हे ह्या निर्मितीचक्राची पूर्ती. त्यांना नभातून सांडत जाणारे चांदणे लखडते, एक सुखद रूप प्राप्त होते. या दानामुळे भुईवर ऋतुगंध कांती सांडते आणि पाखरांशी खेळ मांडून कवी गाऊ लागतो. त्याचे गाणेही निर्मितीचे, चैतन्याचे गाणे असते. नभ आणि भुई यांचे नाते हे पुरुष आणि स्त्री यांच्या नात्यासारखेच' पण एवढे मर्यादित नाही. ही कविता काव्यनिर्मितीप्रक्रियेच्या पूर्व क्षणांच्या सोहळ्याची कविता आहे. 'या नभाने भुईला दान द्यावे' ही ओळ सृष्टीतील पुरुषतत्त्वाचे आणि 'ह्या मातीतुनी चैतन्य गावे' ही ओळ भूमीच्या आदिम सृजनात्मकतेचे सूचन करते. बीज संभावती भूमीच्या उदरातून प्रस्फुटित होणारा हिरवा लखलखता अंकुर म्हणजे साक्षात चैतन्य ! जोंधळ्याला चांदणे लखडून जावे ही ओळ जोंधळ्याच्या कणिसाच्या प्रत्येक बीजाला नभ आणि भूमीचा लागणारा वेध अलवारपणे टिपते. येथे 'रानातल्या कविता' या संग्रहातील १५ क्रमांकाच्या कवितेतील ओळी प्रथम पाहाव्या लागतात.

काचोळीची गाठ सावरीत हळू तयाला सांगितले
तिचिया पोटी पाचघडीचे लख्ख चांदणे अवघडले

'लख्ख चांदणे अवघडले' ही अवस्था गर्भवतीची आहे आणि 'जोंधळ्याला चांदणे लखडून' जाण्याची अवस्था जोंधळ्याच्या बीजरूप अवस्थेचे सूचन करणारी आहे. भूमी आणि नभाचा संयोग होऊन पुढे कधीतरी या जोंधळ्यातूनही चैतन्याचे गाणे प्रस्फुटित होईल. बीजसंभवती भूमीचे बीजसंगोपक रूप 'जोंधळ्याला चांदणे लखडून जावे' या ओळीतून व्यक्त झाले आहे. कुठल्याही सृजनात्मक अनुभवाच्या अंगी बीजरूपातील अपूर्व शक्ती आहे.

सविस्तर वटत्व जैसे
बीजकणिकेमाजी असे ।
आणि बीजकण वसे
वटी जेवी ॥

असे या कलानुभवाचे रूपस्वरूप असते. बीजसंगोपक भूमीने जोंधळ्याचे असे संगोपन केले आहे की एकेक दाणा टपोऱ्या चांदणीसारखा आहे, आणि त्या चांदण्यासारख्या बीजांच्या ठायी सृजनात्मकतेची सुप्त शक्ती दडली आहे. भूमी आणि पाण्याशी तादात्म्य पावताच ते हिरवे चैतन्य गाईल. पहिल्या कडव्यात निर्मितीच्या सृजनात्मक आनंदाचा

भावविभोर सोहळा रंगला आहे. दुसऱ्या कडव्यात काव्यनिर्मितीपूर्व अवस्थांचे चित्रण आहे. भूमीच्या सृजनात्मकतेशी सहकंप पावलेल्या कविमनातील निर्मितीपूर्व अवस्थांतरे येथे आहेत. 'ह्या नभाने भूईला दान द्यावे' ही ओळ पहिल्या कडव्याप्रमाणे दुसऱ्या कडव्याच्या प्रारंभी आली आहे. पण पहिल्या कडव्यातील 'आणि ह्या मातीतूनी चैतन्य गावे' या ओळीच्या जागी 'आणि माझ्या पापणीला पूर यावे' ही ओळ येते. पापणीला पूर येण्याची अवस्था आनंदाची की दु:खाची? काव्यानुभूतीचे बीज मनात धारण झाल्यानंतर तो जीवघेणा आनंद आहे. गर्भारपण आनंददायी असते. पण हा सृजनात्मक आनंद जीवाची काहिली करणारा असतो. येथे स्त्रीच्या सृजनशीलतेशी कवीचे कलावंत मन सहकंप पावले आहे. 'पाहता ऋतुगंध कांती सांडलेली' ही ओळ मोठी अन्वर्थक आहे. सहा ऋतूचे सोहळे भूमीवर रंगतात. प्रत्येक ऋतू भूमीच्या कांतीवर नवे रंग उधळतो. 'पाखराशी खेळ मी मांडून गावे' म्हणजे सृष्टीतील सृजनतत्त्वाशी एकरूप होणे. पाखरांसारख्या येणाऱ्या ऋतूशी खेळ मांडणे म्हणजे भूमीवरील निसर्ग सोहळ्यात रंगणे होय. सृष्टीतला सृजनसोहळा कविमनात रंगण्याची अवस्थांतरे येथे आहेत. या संदर्भात महानोरांच्या पुढील ओळी लक्षणीय आहे.

ह्या शेताने लळा लाविला असा असा की
सुखदु:खाला परस्परांशी हसलो-रडलो.
आता तर हा जीवच अवघा असा जखडला
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो.

अशी 'हिरव्या बोलीचा शब्द होण्याची अवस्था' या दुसऱ्या कडव्यात शब्दरूप झाली आहे. आता या पार्श्वभूमीवर तिसरे कडवे येते, येथे प्रारंभी 'ह्या नभाने भुईला दान द्यावे' ही ओळ येत नाही. कारण नभाने भुईला आणि भुईने कविमनाला 'दान' दिलेले आहे, निसर्गाशी हसणे, रडणे आणि शेवटी 'हिरव्या बोलीचा शब्द जाहणे' ही सारी अवस्थांतरे 'गुंतलेले प्राण या रानात माझे' या तिसऱ्या कडव्याच्या पहिल्या ओळीत विसर्जित होतात. 'फाटकी ही झोपडी काळीज माझे' या ओळीचे उपयोजन कवींच्या हालाखीच्या परिस्थितीचे सूचन करणारी आहे, असे वरवर वाटत असले तरी ते तेवढे खरे नाही. इथे काळीज-मन ज्यात प्रतिभाशक्ती आहे. तिला झोपडीची प्रतिमा दिली आहे. या निसर्गाने-भूमीने-नभाने अनेकांच्या प्रतिभेला शब्दांचे दान दिले आहे. कदाचित त्या योग्यतेची माझी प्रतिभा नसेलही ! पण तरीही भूमीच्या सृजनसोहळ्याच्या क्षणी मी या आनंदाने अक्षरश: बेहोश झालो आहे. निर्मितीला साहाय्य होणाऱ्या सृष्टितत्त्वातील भूमीच्या कल्पनातील-शब्दातील सृजनशक्तीची जाणीव आणि तिच्या भव्य निर्मितिशीलतेपाशी प्रतिभाधर्मानेही आणि जीव म्हणूनही आपण अगदी थिटे असल्याचीही जाणीव या ओळीतून व्यक्त झाली आहे. कविमन भूमीच्या सृजनलावण्याशी तादात्म पावले आहे. नव्हे समर्पित झाले आहे. 'मी असा आनंदुनि बेहोश होता' या ओळीत हा समर्पणभाव संपृक्त अवस्थेला पोचला आहे. आणि यावेळी 'शब्दगंधे, तू मला बाहून घ्यावे !' ही निर्मितीअवस्थेतील सृजनबंधांची आळवणी करणारी ओळ अवतरते. इथे पुन्हा कवी स्त्रीच्या सृजनशीलतेशी तादात्म पावला आहे. काव्यनिर्मितीपूर्व क्षणांची अपूर्व-शब्दातील तगमग येथे विलक्षण अशा प्रतिभाशरण वृत्तीने व्यक्त झाली आहे. भूमी आणि स्त्रीच्या सृजनशीलतेशी सहकंप पावल्यानंतर 'शब्दगंधे, तू मला बाहूत घ्यावे!' ही ओळ निर्मितीची निरंतर आस घेऊनच अवतरली आहे. ना. धों. महानोरांच्या या कवितेत कवीमनातील नवनिर्माणाचा 'अनुपम्य सोहळा' भूमी आणि स्त्री यांच्या सृजनबंधांशी साहचर्य साधत आकाराला आला आहे.

भूमीचे स्त्रीतत्त्व आणि स्त्रीचे भूमितत्त्व कवीमनाला सदोदित साद घालत आले आहे. कलावंताच्या मनात भूमितत्त्व आणि स्त्रीतत्त्व निसर्गत:च असते. सृजन आणि संगोपनाचे नैसर्गिक वरदान भूमीचे आणि स्त्रीचे ठायी असते, हेच वरदान कलावंताला सतत हवे असते, 'गर्भाचे आवडी मातेचा

डोहळा' या निर्मितिसंभव अवस्थेचे मागणे कवी सतत सृष्टितत्त्वाजवळ मागतच असतो. 'शब्दगंधे, तू मला बाहूत घ्यावे!' हे शब्द भूमी आणि स्त्री यांच्यातील सृजनतत्त्वाची मागणीच आळवणारे आहेत. कविता निर्मितीची प्रक्रिया ही सजीव असते, तिच्या ठिकाणी विकसित होत जाण्याची भूमीतत्त्वीय ऊर्जा असते. काव्यनिर्मितीच्या क्षणी कवी आपल्यातील विश्वात्मकतेला शब्दाशब्दाच्या पाकळी पाकळीने फुलवित नेत असतो. सृजनप्रक्रिया ही कवीचा आत्मशोध आणि जीवनशोधही असतो. ही सृजनशीलता नव्या जीवनाला नव्या सृजनशक्तीला जन्म देणारी असते, भूमीच्या उदरातील बीजास अंकुर फुटावे, गर्भाशयातील गर्भास अवयव यावे, तसे सृजनगंध लाभलेल्या बीजानुभूतीस कविमनात शब्द स्फुरत असतात. ही प्रक्रिया जीवघेणी पण आनंदमयी असते.

❑❑❑

संदर्भ ;

०१ रसाळ सुधीर - महानोरांच्या 'रानातल्या कविता'
काही मराठी कवी जाणिवा आणि शैली
प्रतिमा प्रकाशन पुणे,
द्वितीयावृत्ती १९९६ पृष्ठ १८१

❑❑❑

प्रकाशकांसाठी सूचना

१. मराठीत नव्याने प्रकाशित होणारी पुस्तके लेखक / प्रकाशकांनी 'युगवाणी' कडे जरूर पाठवावीत.

२. सर्वच पुस्तकांची परीक्षणे स्थलाभावी देणे शक्य नसले तरी महत्वाच्या पुस्तकांची दखल 'युगवाणी' घेईल.

३. ललित-समीक्षा-संशोधन-वैचारिक अनुवाद या प्रकारातील लेखनाची परीक्षणे 'युगवाणी'त येतील.

।। मर्ढेकरांच्या सामाजिक कवितेचा आशय ।।

। डॉ. अशोक नामदेव पळवेकर

'शिशिरागमा'त मर्ढेकरांच्या वैयक्तिक जीवनातील घडामोडींचे आणि त्याच्या भावजीवनाचे प्रतिबिंब उमटलेले आहे. ह्या व्यक्तिविशिष्टतेचे काही संदर्भ 'काही कविता'मध्ये एक-दोन ठिकाणी; आणि 'आणखी काही कविता' मध्ये सहा-सात ठिकाणी तसेच 'असंगृहीता'मध्ये एका ठिकाणी असल्याचे लक्षात येते. परंतु ही मोजकी कविता वगळता मर्ढेकरांची व्यक्तिनिष्ठ जाणीव मुख्यत्वे त्यांच्या 'शिशिरागमा'तच प्रत्ययाला येते. कारण 'शिशिरागम'च्यावेळी मर्ढेकरांच्या मनात प्रामुख्याने 'शिशिरातील निराधार झालेल्या पाखरांचाच' विचार होता. त्याची जागा पुढील कवितेत नव्या जगात वेगवेगळ्या कारणांनी निराधार बनत चाललेल्या माणसांनी घेतली. म्हणूनच मर्ढेकर 'काही कविता' मध्ये अंतर्यामी स्वतःचे एकटेपण जपत त्या माणसांचे प्रतिनिधी बनून समूहनिष्ठ होतांना दिसतात; आणि अंतर्यामी एकटेपण जपण्याच्या भूमिकेमुळे 'आणखी काही कविता' मध्ये आध्यात्मिक निष्ठेकडे वळतात.

'काही कविता' आणि 'आणखी काही कविता' ह्या दोन्ही संग्रहातील कवितांना यंत्रसंस्कृती, सत्तापिपासा, महायुद्ध आणि वर्ग विषमता यांची पार्श्वभूमी असलेल्या नव्या जगाविषयीचे भान आहे. या भानातूनच त्यांची समूहनिष्ठ जाणीव आकाराला आली आहे.

युरोपात विज्ञान प्रगतीचा प्रकर्ष झाला. त्यामुळे मानवी जीवनाचा जटिल प्रश्न आणि विश्वाचे रहस्य आपण या विज्ञानाच्या सामर्थ्याने सोडवू असा दुर्दम्य विश्वास माणसाच्या मनात निर्माण झाला. परंतु यंत्र संस्कृतीच्या आणि भांडवलशाहीच्या विकासाबरोबर एक अंतर्विरोधात्मक प्रक्रिया समाजात निर्माण होत होती. एका बाजूला कारखान्यांची भरभराट होत असल्यामुळे माणसांचा लोंढा शहराकडे सरकत होता. त्यामुळे शहरे वाढत होती. कारखान्यातील स्वस्त मालाच्या पुरवठ्यासाठी शेतकरी वर्गाचा आणि शेतीचा बळी दिल्या जात होता. खेडी उद्ध्वस्त होती. शहरात स्थलांतरीत होणाऱ्या लोकांची संख्या सतत वाढत असल्यामुळे प्रचंड गर्दी वाढली. परिणामी झोपडपट्ट्यांची वाढ झाली. शेतकऱ्यांची, कामगारांची, अवाढव्य नफेखोरीतून लूट होऊन शोषणाची प्रक्रिया गतिमान होत होती. कारखानदारांच्या, व्यापाऱ्यांच्या ह्या नफेखोरीतून त्यांच्या गगनचुंबी इमारती उभ्या राहू लागल्या. महागाई शिगेला पोहचू लागली. या सर्व परिस्थितीत सर्वसामान्य माणूस हवालदिल होऊ लागला. आर्थिक विषमतेमुळे समाजात रुंदावत जाणारी दरी निर्माण झाली. मध्यम वर्गातही स्तरीकरणाची प्रक्रिया झपाट्याने वेग घेऊ लागली. जागतिक भांडवलशाहीचे अरिष्ट कोसळून मंदीची लाट पसरल्यानंतर अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. या अरिष्टातून बाहेर पडण्यासाठी भांडवलशाहीने वॉर इंडिस्ट्रीवर, युद्धोन्मुख

अर्थव्यवस्थेवर भर द्यायला सुरवात केली. जनतेच्या वाढत्या असंतोषाला दडपून टाकण्यासाठी भांडवलशाहीने युरोपात फ्रँको, हिटलर, मुसोलीनी या हुकूमशहांना पुढे केले. वसाहतींचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे त्यांच्या फेर वाटपांसाठी भांडवली राष्ट्रात झगडे सुरू झाले. त्यातूनच पहिले व दुसरे महायुद्ध उद्भवले. ह्या दोनही महायुद्धांच्या प्रत्यक्ष संहारामुळे विज्ञानाच्या प्रगतीसामर्थ्याने मानवी जीवनाचे जटिल प्रश्न आणि विश्वाचे रहस्य आपण उलगडू या विश्वासाला तडा गेला. भांडवलशाहीच्या ऱ्हासकाळात मानवीमूल्यांचाही ऱ्हास होऊ लागला. मानवाच्या कल्याणासाठी निर्माण झालेल्या ज्ञान, विज्ञान, यंत्र, यांचा वापर सत्तेखोरांनी आणि भांडवलदार वर्गांनी आपल्या स्वार्थासाठी करणे सुरू केले. समाज जीवनावर भांडवलीव्यवस्थेचे वर्चस्व स्थापन होउन 'पैशाला' प्रचंड महत्व आले. उदयोन्मुख भांडवलशाहीची स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही मूल्ये हळूहळू विसर्जित होऊन त्यांची जागा व्यक्तिस्वार्थ, पराकोटीची स्पर्धा आणि उपभोगवाद यांनी घेतली.

भारतात इंग्रजी पारतंत्र्याची काळरात्र संपून फाळणीची आग ओकीत स्वातंत्र्य आले. फाळणीमुळे निर्माण झालेल्या जातीयदंगली जाळपोळ, सामूहिक कत्तली यातून स्वातंत्र्याची वही रक्ताने माखली. कडव्या आणि आंधळ्या धर्मवेडात माणूस बुडून गेल्यामुळे मानव्य आगीत होरपळू लागले. राजकीय जीवनातील ध्येयवाद तकलादू ठरला. व्यक्तिस्वार्थ फोफावू लागला. जुनी श्रद्धामूल्ये उजाड होऊ लागली. सामान्य माणूस परिस्थितीच्या ओझ्याखाली अधिकच रगडल्या जाऊ लागला. भांडवलशाहीचे वर्चस्व प्रस्थापित होऊन लोकशाही समाजवादाचे स्वप्न उजाड झाले.

मर्ढेकरांच्या 'कांही कविता' आणि 'आणखी कांही कविता' या मधील कवितांना ह्या भारतीय व जागतिक परिस्थितीतील घटनांची पार्श्वभूमी आहे. निशिकांत ठकार यांनी म्हटल्याप्रमाणे, 'साम्राज्यवाद आणि भांडवलशाही यांचे दुष्परिणाम, त्यामुळे सामाजिक व वैयक्तिक जीवनात येणारे दैन्य आणि लाचारी, स्वार्थ आणि ढोंग, यंत्रयुगामुळे आलेली कृत्रिमता, यांत्रिकता व अमानुषता, महायुद्धाने घडविलेले भीषण परिणाम, माणसांची व माणुसकीची झालेली हानी, राष्ट्रवादाचे फॅसिझममध्ये झालेले रूपांतर, बीभत्स आणि घृणास्पद जीवन ही सर्व विटंबना मर्ढेकरांनी पापणी उघडी ठेवून पाहिली.' त्यामुळे मर्ढेकरांच्या कवितांना यंत्रसंस्कृती, भांडवलशाही प्रधानता, वर्गविषमता, सत्तांधता, स्वार्थलोलुपता या सर्वांची पार्श्वभूमी असलेल्या जगाचे भान आले आणि त्यांनी 'काही कविता' आणि 'आणखी काही कविता' मध्ये समकालीन वास्तवाचे भेदक व विदारक दर्शन घडविले.

दुसऱ्या महायुद्धातील नरसंहार आणि भारताला मिळालेले जखमी स्वातंत्र्य यांनी मर्ढेकर अधिकच अस्वस्थ झाले. मानवी जीवनात उफाळलेल्या भीषणतेने त्यांचे मन भांबावून गेले. व्यक्तिगत दुःखाखातर मरण्यापेक्षा–

'– मी म्हणूनीच
लांबवले मरणाला;
गारदून जाले जेंव्हा–
चिता हवी शेगोटीला.'

(शि. क्र. २०/१९)

असे म्हणत जगण्यासकट आपले मरण इतरांच्या कामा यावे अशी 'शिशिरागमा'च्या शेवटी प्रतिज्ञा करणाऱ्या मर्ढेकरांनी पृथ्वीला फुलांनी भरलेली परडी समजून तिच्याकडे नजर टाकली तेव्हा ती पृथ्वीच मानवतेला घेऊन जळणाऱ्या तिरडीसारखी त्यांना दिसली. या वास्तवाने त्यांचे मन अधिकच कळवळले; आणि समूहमनाशी जुळून गेले. म्हणूनच मानवी जीवनाची करुण गाथा सिद्ध करतांना–

'आहे रक्तात उजाळा । सूक्ष्मदर्शी चष्माडोळां,
नाही बुद्धीचा । मानव मी।।'

(कां. क. क्र. ६/२८)

अशी बुद्धीशी इमान राखणारी मानवी सामर्थ्याची भूमिका त्यांनी घेतली. विज्ञानाच्या संहारक शक्तीमुळे

घडून आलेल्या मानवी संहाराच्या बाबतीत–

'येथ शब्द नाही विज्ञाना ।
हें अवघें मानव्याविना'

(कां. क., क्र. ११/३२)

या जाणिवेने, मनातील एकेक श्रद्धाविश्व उद्ध्वस्त होत असतांना ज्ञान-विज्ञान आणि यंत्रसामर्थ्याने माणूस सुखी व्हावा ही अपेक्षा ठेवून विज्ञानावरची निष्ठा त्यांनी अभंग ठेवली.

वैश्विक पातळीवर महायुद्धाचा वणवा होता. आंधळ्या सत्ताकांक्षेतून तो निर्माण झाला होता. या जाणिवेने मर्ढेकरांनी १९४३ ते १९४६ ह्या चार वर्षांच्या काळात 'तीन युद्धकालीन अभंग' आणि 'आग अंधाराची जीवा' व चार वर्षानंतर १९५० साली 'अजून येतो वास फुलांना' ह्या युद्धाचा संदर्भ असलेल्या पाच कविता लिहिल्या. यापैकी 'आग अंधाराची जीवा' या कवितेची आध्यात्मिक आशयाची कविता म्हणून चर्चा केली जाते, ती चुकीची आहे. कवितेत युद्ध-संदर्भ आहेत. म. वा. धोंडांनी या कवितेतील युद्ध-संदर्भाची सविस्तर चर्चा करून कवितेचा नेमका आशय उलगडून दाखविलेला आहे. तो एकूणच युद्धजन्य स्थितीवर प्रकाश टाकणारा आहे, हे मान्य केले पाहिजे.

वैश्विक स्तरावर महायुद्धाचे जसे वर्णन होते, तसेच मानवी जीवनाला घेरून टाकणारे स्वतंत्र वणवे भारताच्या भूमीवरही होते. देशाला स्वातंत्र्य मिळाले; परंतु फाळणीमुळे त्या स्वातंत्र्याची वही स्वजन रक्ताने माखली होती. समाजात दुही निर्माण झाली होती. म्हणूनच,

'कां हो माजवितां दुही ।
माखतां स्वातंत्र्याची वही
स्वजनरक्ताने प्रत्यहीं । लळथळा ।।'

(कां. कं., क्र. ८/२९)

असा प्रश्न मर्ढेकरांनी विचारला.

आंधळ्या धर्मवेडातून आपल्या भूमीवरचे मानव्य होरपळू लागले होते. धर्माचे पोवाडे गाणाऱ्यांनी–

'अरे हिन्दु-मुसल्मान । प्राण देशावरी कुर्बान;
परी यादवी ही लांछन । अल्ला-रामां।।'

(कां. क., क्र. ८/२९)

ही जाणीव न ठेवल्यामुळे दंगली पेटल्या होत्या. हत्याकांडे घडून आली होती. या भीषण परिस्थितीचे नियंत्रण सत्तेची लूत भरलेली पुढारी करू शकले नाही. त्यामुळे–

'केला धर्माचा लिलाव ।
बुरखेवाली सत्ता हाव,
येथे तुम्हां आम्हां राव । मात्र मौत ।।'

(कां. क., क्र. ८/२९)

असे मरण सर्वसामान्यांच्या वाट्याला आले. म्हणूनच देशभक्तीची जागा वेषभक्तीने घेतल्यामुळे मूल्ये आणि आचार यांच्यात विसंगती निर्माण झाल्याची जाणीव मर्ढेकरांनी मांडली.

जागतिक स्तरावर युद्धखोर राष्ट्रांच्या जीवनात जशी काही जीवनमूल्ये होती, तशीच जीवनमूल्ये आणि ध्येयवाद आपल्याही जीवनात होता. पण त्या जीवनमूल्यांची पायमल्ली दोस्त राष्ट्रांनी केली होती. आपल्याकडेही मानवी जीवनातील ध्येयवाद ओसरत जाऊन जीवनमूल्यांवरची निष्ठा ऱ्हास पावत होती. मर्ढेकरांच्या समूहजाणिवेला हे भान होते. त्यामुळे सर्वसामान्यांचा समाज विनाशपर्वात ढकलला जात असतांना–

'सत्तेचेंच तूप । सत्तेचीच पोळी,
मानव्याची होळी । भाजाया ती ।।'

(कां. क. क्र. १९/४०)

अशी जाणीव त्यांनी कळवळ्याने मांडली. ध्येयवाद ओसरल्यामुळे राजकीय लोकांच्या जीवनात आणि आचारात तत्त्वशून्यता आली. समाजातही मूल्यहीनता सर्वदूर पसरू लागली. देशासाठी तळहातावर आपले शीर घेऊन लढणारा सैनिक आता केवळ पोटासाठी / भाकरीसाठी लढू लागला.

'देशावर माया
कुणाच्या ? कोणाची ?
पडल्या फळाची
आज्ञा होतां वीर

हातीं घेई शीर कुणाचें ? कशाला ?
– भाकरी पोटाला !!'

(कां. क., क्र. १/२४)

त्याची इच्छा असो-नसो तरी सत्तापिपासू लोकांच्या तालावर नाचून इतरांचा जीव घेणे, स्वत:चा जीव देणे एवढेच कर्तव्यकर्म त्याच्या लेखी महत्त्वाचे ठरू लागले. आणि धूर्त नेते ईर्षा, अहंता, असूया यांची इंजेक्शने टोचून सर्वसामान्य माणसांच्या भावना भडकवू लागले. आंधळ्या धर्मवेडाचे उदात्तीकरण करू लागले. त्यामुळे सर्वसामान्यांच्या संज्ञा बोथट होऊन गेल्या. त्यांचे अतर्याम अंधारून गेले.

'अंधारले अंतर्याम । दिला जेव्हा क्लोरोफार्म;
शक्ती असूनिही वर्म । निपचित ।।'

(कां. क., क्र. ९/३०)

याप्रकारे सर्वसामान्य माणसाला शक्तीहीन केले गेले. तो आंधळा-पांगळा झाला. आणि–

'जे न जन्मले वा मेले ।
त्यांसी म्हणे जो आपुले'

(कां. क., क्र. ३/२५)

अशी आशा आणि माया नसलेले लोक त्या सामान्यजनांचे नेते झाले. याच दांभिक प्रवृत्तीतून–

'शुभ्र खादीबंद शेट । जया हिंसाधर्म-वीट,
युद्ध-साहित्य-कंत्राट । घेण्या उभा ।।'

(कां. क., क्र. ११/३२)

असे चित्र समाजजीवनात दिसायला लागले. जीवनातील ही विसंगती केवळ दांभिकतेमुळे, स्वार्थांधतेमुळे आणि मूल्यहीनतेमुळे असल्याने मर्ढेकरांनी या वृत्ती-प्रवृत्तीचा उपहास केला.

यंत्रयुगात मानवी जीवनातली जुनी सात्त्विक मूल्ये खचायला लागल्यामुळे समाजजीवनात स्वार्थांधता आणि श्रद्धाशून्यता वाढीला लागली. तसेच पृथ्वीचा स्वामी असलेल्या माणसाचे जीवन या यंत्रयुगात क्षुद्र बनले. त्याच्या जीवनात अस्थिरता, अशांती, गर्दी, धावपळ, निर्जीवता ह्या सर्व गोष्टी आल्या. गिरणीच्या भोंग्याने त्याचा दिवस उगवायला लागला. या अणुयुगात त्याचा जीव मात्र पैशाला पासरीच राहिला. कारण–

'जाणें भांडवली वृत्ती । नष्टचर्य पिकवी चित्तीं;
आणि कामगारा हातीं । करवंटीच ।।'

(कां. क. क्र. ११/३२)

मनात असे नष्टचर्य पिकत असल्याने भांडवलीवृत्तीमुळे कामगाराच्या हाती त्याच्या श्रमाचे फळ न येता करवंटीच आली. दारिद्र्यात उद्ध्वस्त होणारे त्याचे जीवन त्याने निमूटपणे जगावे म्हणून त्याला संज्ञाशून्य केले गेले. या संज्ञाशून्यतेशिवाय आपला 'मंत्रावीण यज्ञ' चालूच शकणार नाही, ही जाण भांडवलदारांना होती. या संज्ञाशून्यतेमुळे कोणती मूल्यशून्यता आपल्याला उद्ध्वस्त करीत आहे, याचे भान त्या सर्वसामान्यांना/कामगारांना उरले नाही. आणि,

'सकाळी उठोनी । चहा-कॉफी घ्यावी,
तशीच गाठावी । वीज-गाडी।।'

(कां. क., क्र. ७/२८)

हे दररोजचे 'रुटीन' स्वीकारणे त्याला भाग पडले. मर्ढेकरांनी मानवी जीवनातील ही यंत्रजाणीव मांडतांना भांडवलशाहीच्या मक्तेदारी अवस्थेतील ऱ्हासमान अध:पतित जीवनाचे अत्यंत उद्विग्न जाणिवेने चित्र रेखाटलेले आहे.

आपल्या समकालीन जीवनाचा आशय अनुभवतांना परिस्थितीचे ॲसिड पिऊन जगणाऱ्या माणसांची मने कशी लिबलिबित झाली आहे याचा प्रत्यय मर्ढेकरांना आला. स्त्री जीवनातील मांगल्य आणि ऊर्जेचा पूजाभाव स्वत:च्या मनात जपणाऱ्या मर्ढेकरांना स्त्री जीवनातील हलाखी दिसली. संसाराच्या खाईत निबरट किरटी हाडबंडले झालेल्या बायका आपले चिमणे जीवन विणीत बसलेल्या दिसल्या. भीक मागत फिरणाऱ्या लहान पोरांच्या पाठीमागे असलेल्या लाचार आया दिसल्या. शोषण व्यवस्थेतील स्त्री ही केवळ भोग वस्तू आहे, तिचेही जीवन यंत्रवत आहे. ती आपल्या अस्तित्वापासून खूप दूर आहे. तिला स्वत:चे व्यक्तित्त्व नाही; अस्तित्व नाही. ही रचना स्त्रीचे केवळच शोषण करते आणि

अनुक्रमणिका

शोषणाच्या प्रवृत्तीतून 'वेश्या' हे स्त्री रूप जन्माला येते. या स्त्री-रूपातील-

१: *'- अशीच होती नकटी एक,*
उलटे केस नि तिरप्या भिवया;
मुरकत दावी उरोज उन्नत,
ढेपा जैशा तेल्याघरच्या. '

(आ. कां. क. , क्र. ५२/६२)

२: *'त्या नाक्यावर तंग हवेली*
उत्साहाची ठिगळ्या चोळी
घालुनि बसली, बोथटलेली
शिळीं स्तनाग्रें झाकित:'

(आ. कां. क. क्र. ३/७५)

असा अवयवांचा मांडलेला बाजार पाहून मर्ढेकरांच्या मनातील स्त्री मांगल्याची प्रतिमा फाटून जाते. आणि-

'काय हलाखी स्त्रीत्वाची ही;
माणुसकीचें काय विडंबन!'

(कां. क. क्र. ५२/६२)

असा उद्‌गार त्यांच्या ओठावर येतो.

एकीकडे मलमल ल्यालेल्या मवाली इमलेवाल्यांची चैन, सर्वसामान्यांच्या शोषणातून उभे राहिलेले वैभव; तर दुसरीकडे भीक मागणारी एवढीशी पोरे, भोगव्यथेचे लिंगगंड प्रच्छन्न प्रदर्शन करणाऱ्या स्त्रिया आणि संसारातील जगण्याचा पाढा चुकलेले असंख्य जीव पाहून आर्थिक विषमतेमुळे हा भयानक विरोध समाजात निर्माण झाला आहे अशी स्पष्ट जाणीव मर्ढेकरांना झाली. म्हणूनच -

१: *'कुणि मारावें, कुणी मरावें;*
कुणी जगावे खाउनि दगड;
वितळवून कुणि आयुष्यांना
ओतावे अन् सोन्याचे घड'

(आ. कां. क. क्र., ५/७७)

२: *'कुणि पेरावा घाम आणखी*
झोडावी कुणि अखंड पंगत

(आ. कां. क. क्र. ,१९/९२)

असे सांगून

'जगायची पण सक्ती आहे;
मरायची पण सक्ती आहे'

(कां. क. क्र. ,२१/४१)

या जगण्या-मरण्याच्या सक्तीत अडकलेली सर्व माणसे त्यांच्या सत्वहीन जीवनामुळे-

'सर्वेजन्तु रुटिना । सर्वेजन्तु निराशया:'

(आ. कां. क. क्र. , १६/९१)

आहेत,असे मर्ढेकरांना वाटते; आणि या निराशय आयुष्याचे जीवारण्य त्यांच्या नजरेच्या कवेत येते. या जीवारण्यातील: चित्याच्या पायाने रस्ता झाडणारी झाडूवाली, दो दिडक्यांची कडू दोडकी आणणारी नोकर माणसे, हरिणीच्या पायाने शिररस्त्यातील सगळी कामे उरकणारी गृहिणी, भाकरीसाठी लढणारे सैनिक, भिक्षा मागणारी एवढीशी पोरे, त्यांच्या पाठीमागे असलेल्या त्यांच्या लाचार आया, तिरप्या भिवयांची नकटी, उष्ट्या अन्नाला लाचार, महाग भिकारी, खुज्या मनाच्या रुळावर वळवळणाऱ्या वडारणी, फलाटदादा, ओल्या पिंपातील उंदीर, गोंगाटणारा कामगारवृंद, उत्साहाची ठिगळ्या चोळीवाली तंग हवेली, गाल बसलेली मातीची खप्पड झोपडी, गर्भपात झालेली मोलकरीण, तिला घास भरवणारे तिची मालकीण, गिरगावांतील हाडबंडले बायका, गाडीवान, शुभ्रखादीबंद सेठ, पीली पगडीवाला, मळक्या वस्त्रातला मेकॅनिक, ताणून देणारा ढेरपोट्या, लक्तराभरणी चाचपडणारा आंधळा, अज्ञानात जन्मलेले आणि अज्ञानातच मरणारे गरीब जीव, परदु:खे न हळहळणारे ज्ञानवंत, कुणी मरणारे, कुणी मारणारे, कुणी रडणारे, कुणी हसणारे आणि -

'ऐसे इतरही अगण्य । ज्यांचें मिळून जीवारण्य
देई विश्वदर्शनाचे पुण्य । चिन्हमात्रें ।।'

(कां. क. क्र. , १४/३५)

असे चिन्हमात्र दर्शन देणारे जीव आपआपली भूमिका निभवत असतात. त्यांच्या जगण्यातील सजीवता संपून गेलेली असते. परिस्थितीचा काढा गळ्याखालती उतरवित जगणे एवढेच त्यांच्या हाती

असते.

या जीवारण्यात अनेकविध द्वंद्वे दिसतात. ही सर्व द्वंद्वे मानवी जीवनातील सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक पातळीवरची होती. या द्वंद्वांतून निर्माण झालेली सामान्य माणसांच्या जीवनातील परिस्थितीची कोंडी फुटावी असे मर्ढेकरांना वाटले. ही कोंडी फोडण्याचे सामर्थ्य केवळ सामान्य दलित माणसातच आहे असा विश्वासही त्यांनी बाळगला. आणि,

'नंग्यांचाच आता । येथे कारभार
कोंडी आरपार । फोडाया ही'
(कां. क. , क्र. १९/४०)

या विश्वासावरच त्यांनी–
'फिरवा फिरवा रे दांडी
आणि मारा ही गचांडी'
(कां. क. , क्र. ६/२८)

असे सर्वसामान्यांच्या शक्ती–सामर्थ्याला आवाहन केले. कारण, मानवी जीवनातील ही कुरूपता भांडवली रचनेमुळे आणि मानवविन्मुख विज्ञानामुळे आहे असे त्यांचे मानणे होते. त्यामुळे 'या बदलत्या भौतिक परिस्थितीतील मर्ढेकर सुरवातीला समाजवादी जाणिवा घेऊन सामोरे गेले' हे मत या संदर्भात खरे वाटते. गो. वि. करंदीकर यांनी म्हटल्याप्रमाणे–'काहीं कवितेमधील मर्ढेकर हे मुख्यत: सामाजिक जाणिवेचे कवी आहेत. १) विज्ञानातील मूलभूत निष्ठा. २) विज्ञान व बुद्धिवाद मानवसन्मुख ठेवण्याची तळमळ. ३) भांडवलशाहीतील अंतर्विरोधांची व पिळवणुकीची जाणीव. ४) मूलभूत गरजांच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या मानवी ऐक्याचा साक्षात्कार. ५) अज्ञानी, दलित व सामान्य माणसांविषयी अथांग सहानुभूती. ६) क्रांतीच्या अटळतेची चाहूल व भांडवलशाही कोंडी दलित समाजाकडून फुटणार ही निष्ठा. ७) प्रस्थापित नेतृत्वाविषयी चीड, पोकळ अध्यात्म व पोषाखी संस्कृती यांचा तिरस्कार. या सर्व गोष्टी 'काहीं कविता' तील सामाजिक जाणीव ही साम्यवादाकडे झुकणारी आहे हे सिद्ध करतात'

मर्ढेकरांची ही जाणीव मानवकेंद्री होती. ही जाणीव मात्र पुढे बदललेली दिसते. कारण अनेकविध द्वंद्वांनी अंतग्रस्त असलेला हा समाज व त्याच्या वाट्याला आलेला काळोख आपण कितीही दिव्यांनी पंक्चर करीत बसलो तरी त्यात हवा भरणारे 'आणखी कुणी' तरी असल्यामुळे आपला मानवी अहंकार निरर्थक आहे. या भूमिकेवर ते स्थिरावले. या भूमिकेमुळे मानवी सामर्थ्यावरचा त्यांचा विश्वास उडून गेला; आणि मानवी जीवनातील उद्विग्नता पुन्हा–पुन्हा त्यांना प्रत्ययाला येत राहिल्यामुळे मानवाच्या वाट्याला आलेले जीवन हे जगण्याची सक्ती असलेले,मरण्याची सक्ती असलेले, भयग्रस्त मनाने मृत्यूची वाट पाहणारे, परिस्थितीला शरण जाणारे असेच आहे, या जाणिवेतून त्यांच्या मनात मानवी जीवनाची उगीचता जन्माला आली. म्हणूनच–

'जगून थोडें अखेर मरणें
उघडझाप ही डोळ्यांचीच'
(आ. कां. क. क्र. , ३२/१०२)

यापेक्षा मानवी जीवनाचा वेगळा अर्थ त्यांना आकळला नाही. मानव हा चिरंतन अपूर्णांक आहे हेच सत्य मर्ढेकरांनी प्रमाण मानले. आणि –

'नळींतले जग नळींत जगतें
उगाच रुसवा रसायनाचा;
उगाच दावा मानवतेचा
आणिक डंका सामर्थ्याचा !'
(आ. कां. क. क्र. , ३५/१०५)

ही वास्तवता परम सत्याच्या कसोटीवर स्वीकारून मानवी सामर्थ्याच्या परिघातून ते निर्णायकपणे बाहेर पडले.

सामान्य माणसाच्या वाट्याला आलेली निराशय जीवनाची उद्ध्वस्तता ही इथल्या व्यवस्थेचेच फलित आहे; आणि ईश्वरही त्याच व्यवस्थेतील शोषकांचा पाठीराखा आहे असे मानून –

'जयें केली ऐशी कृपा । नाव माधवाचें जपा,
म्हणा,'तमहं वंदेम पां । ब्रम्हानंदा ।।'
(कां. क. क्र., ६/२८)

'पाहिलें या डोळा
विश्वंभर भोळा
सडवी पाचोळा
मु लविण्या ज्वाळा'

(कां. क. क्र., १/२४)

'राव, सांगतां देव कुणाला ?
शहाजोग जो शहामृगा सम;'

(कां. क. क्र., ४३/५६)

याप्रकारे ईश्वराचा उपरोधिक उल्लेख करणारे 'मर्ढेकर ईश्वराच्या अस्तित्वालाच आव्हान देत होते.' देवाला शहामृग म्हणतांना त्यांच्या मनात एक तीव्र जळजळ होती. 'शहामृग जसे अलिप्तपणे आसपासच्या घडामोडी पाहत असतो.' किंवा इथे शहामृग हा शब्द कदाचित ostrich या इंग्रजी शब्दाच्या ध्वन्यार्थाला धरून वापरण्याची शक्यता आहे. कारण देवाला शहामृग हे प्रतिमान भारतीय परंपरेत बसत नाही. A person who refuses to acknowledge an awkward truth असाही अर्थ आहे. जगणाऱ्यांच्या अंगावर शेकणारे जीवन शहाजोगपणे पाहणाऱ्या देवाची ही अलिप्तता नसून त्याने बुद्ध्याच या स्वत: निर्माण केलेल्या विरोधाकडे दुर्लक्ष करून निवांतपणे करपट ढेकर द्यायचे ठरविले असावे ध्वनी मर्ढेकरांच्या एकूण मूडशी सुसंगत वाटतो,

'बोंबिल तळलों सुके उन्हांत,
आणि होतसे हड्डी नरम.
छान शेकतें जगणें येथे
जगणारांच्या हें अंगाला;
निदान ढेकर करपट आणूं
द्या तुमच्या त्या शहामृगाला !'

(कां. क. क्र. ,४३/५६)

या ओळींतून मर्ढेकरांनी देव कल्पनेचा स्वीकार करणाऱ्यांना आव्हानच दिलेले आहे. दुसरीकडे असे म्हटले आहे की, या देवाचं कौतुक पुष्कळ झालं.

'सांदीला पण सोवळ्यांत जो
आजवरी हा देव ठेवला
धरावयाच्या मुळ्या फांदिने
ओवळ्यांत तर प्रभूस काढला.'

(आ. कां. क. ,क्र. २०/९३)

हा देव मंगल वगैरे तुम्ही म्हणता,पण त्यांच्या मांगल्याचा प्रत्यय येत नसेल तर खुशाल सोवळ्याचा ओवळा करून टाका. त्याला ढकला, त्याची जी प्रतिष्ठापना तुम्ही करून ठेवलेली आहे ती हलवा.' अशी भूमिका घेणाऱ्या मर्ढेकरांनी मानवी सामर्थ्याच्या परिघातून बाहेर पडल्यानंतर शेवटी बुद्धिवादाच्या, विज्ञानाच्या आणि मानवी सामर्थ्याच्या मर्यादा मान्य करीत -

'किती विर्तीचें जीवन माझे
तुलाच ठावें; सदारंग तूं'

(कां. क. ,क्र. ५४/६३)

हे ईश्वरी अस्तित्वाचे नियंतृत्व स्वीकारले आणि मानवी जीवनाच्या पोरकेपणाच्या जाणिवेने व्याकुळ होऊन पुढील प्रवास अध्यात्मसन्मुख जाणिवेने परमार्थाकडे सिद्ध केला. त्यामुळे मानवी जीवनातील कुरूपता नष्ट करण्यासाठी सुरुवातीला समाजवादी जाणिवा घेऊन बदललेल्या परिस्थितीला मर्ढेकर सामोरे गेले असले तरी समाजवादी जाणिवेची मूल्ये मध्येच सोडून देऊन पारंपरिक मूल्यांना सोबत घेऊन ते परिस्थितीला सामोरे गेले. ही मर्ढेकरांची वर्गीय मर्यादा मानली पाहिजे.

□□□

संदर्भ सूची :-

१. निशिकांत ठकार मराठी कविता स्वरूप आणि विवेचन, पुणे, १९७७, पृष्ठ ३४०

२. म. वा. धोंड तरीहि येतो वास फुलांना, पुणे, १९९९, पृष्ठ १२८

३. स. त्र्यं. कुल्ली: तीन अर्वाचीन कवी मार्क्सवादी दृष्टिक्षेप,मुंबई,१९८९, पृष्ठ ९१

४. गो. वि. करंदीकर परंपरा आणि नवता,मुंबई,१९६७,पृष्ठ २२२

५. विनय हर्डीकर : कारुण्योपनिषद्, पुणे, १९९९, पृष्ठ ७८

६. तत्रैव, पृष्ठ ७९-८०

।। केशवसुतांच्या कवितेतील नैराश्य : एक चिंतन ।।

। डॉ. सुभाष गढीकर

केशवसुतांच्या काव्यातील निराशेबद्दल समीक्षकांनी विपुल लिहिले आहे. निराशेमागील कारणांचा शोधही विविध दृष्टिकोणातून घेण्याचे प्रयत्न झाले आहेत. केशवसुतांचा स्वभाव, आर्थिक स्थितीपासून तो 'हरपलेल्या श्रेया' पर्यंतचे मुद्देही चर्चिले गेले आहेत. केशवसुतांचा किरकिरा, उदासीन स्वभाव,' फारशी चांगली नसलेली आर्थिक स्थिती, रसिकांकडून उपेक्षा अशी कारणमीमांसा सीतारामपंतांनी दिली असली तरी केशवसुतांच्या काव्यातील निराशेचा त्यांनी स्वतंत्रपणे विचार केल्याचे दिसत नाही.

भ. श्री. पंडितांनी 'केशवसुतांच्या कवितेतील निराशा' हा लेख १९५२-५३ सालच्या 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'त लिहिला. तोच लेख 'केशवसुत स्मृतिग्रंथा'त समाविष्ट केला असून, हाच लेख पंडितांच्या 'पाच चिंतनिका' या ग्रंथात 'केशवसुतांचा विराग' या शीर्षकाने समाविष्ट करण्यात आला आहे. केशवसुतांच्या काव्यातील निराशेचा शोध घेतांना अनेक मुद्यांना पंडितांनी स्पर्श केला आहे. आणि शेवटी ''हा महान कवी अनुकूल परिस्थितीत वाढला असता तर त्याचे काव्य विशाल, व्यापक व विस्तृत झाले असते. ते तसे का झाले नाही हे दाखविण्याचा हा एक लहानसा प्रयत्न'' असल्याचे नमूद केले आहे. अनेक कारणे तपासल्या नंतर 'अनुकूल परिस्थिती नसणे' या कारणाचा स्वीकार भ. श्री. पंडितांनी करावा हेही आश्चर्यकारक आहे. पंडितांप्रमाणेच अनेक समीक्षक या विषयाकडे वळले व त्यांनीही आपआपल्या दृष्टीने निराशेचा मागोवा घेतला.

यासंदर्भात केशवसुतांचा जीवनविषयक दृष्टिकोण स्पष्ट करतांना रा. श्री. जोग म्हणतात- ''व्यक्तीदृष्ट्या जीवनाकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोणाला दोन बाजू आहेत. एक आशावादी, युयुत्सु अशा माणसाचा. दुसरा निराशावादी, हताश व्यक्तीचा. एतद्विषयक विचार आलटून पालटून येत असल्याने एकच एक स्थिर असा त्यांचा दृष्टिकोण कोणता हे ठरविणे कठिण होते. सर्वसाधारण समजूत अशी आहे की तो नैराश्यपूर्ण आहे.'' असे नमूद करणारे प्रा. रा. श्री. जोग केशवसुतांच्या निराशेमागील कारणांचा उल्लेख करतांना शिक्षणातील अडचणी, अधिक शिक्षण मिळण्याची अशक्यता, नोकरीतील अस्थायित्व व असमाधानकारकता, तुटपुंजी प्राप्ती, विशेष सुखकारक नसलेले जीवनमान या गोष्टींचा उल्लेख करतात.

निराशेचा मागोवा

केशवसुतांच्या काव्यातून व्यक्त होणाऱ्या निराशेमागे ही कारणे असतीलही पण तेवढीच मात्र नाहीत. या कारणांच्या पलिकडे जाऊन कवितांचा मागोवा घेत गेलो की काही तथ्ये हाती लागतात. काळाचा ठसा जसा केशवसुतांवर पडला आहे तसाच तो त्यांच्या कवितांतूनही उमटला आहे. त्याकाळी

सामाजिक आदी सर्वच क्षेत्रात परिवर्तनाची लाट उठली होती. त्याचा प्रभाव संवेदनशील मनाच्या केशवसुतांवर पडणे साहजिकच होते. साधे सूर्यास्ताचे दृष्य पाहून स्वातंत्र्याचा सूर्य पश्चिमेला गेल्याची खंत त्यांना वाटते ती त्या संवेदनशील मनामुळे. केशवसुतांना लोकमान्य टिळक, गो. ग. आगरकर शिक्षक म्हणून लाभले होते. त्याकाळचे पुण्याचे वातावरणही तसेच भारावून टाकणारे होते. केशवसुतही मनाने त्यात सहभागी झाले नसते तर नवलच. त्यांच्या जागृत मनाची स्पंदने स्वातंत्र्यविषयक कवितांतून व्यक्त झाली आहेत. (देवा ! केव्हा परवशपणाची निशा ही सरून – स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून ?') या स्वातंत्र्य समरात सहभागी होण्याची इच्छा असूनही आपल्याला ते शक्य नाही हे लक्षात येताच, आपण नाहीतर निदान आपल्या भावाने तरी त्यात भाग घ्यावा अशी अपेक्षा ते व्यक्त करतात (गोष्टी घराकडील...) स्वातंत्र्यासाठी झटणारा मित्र त्यांना आठवतो. त्याच्या सहवासातील स्वातंत्र्याबद्दल चर्चा आठवतात. देशासाठी काय करता येईल याचे आखलेले मनसुबे आठवतात (गावी गेलेल्या मित्राची...) मित्र निघून गेला... आपण मात्र काही करू शकलो नाही याची खंत, त्या जिवंत मनाला डाचत राहते. पण ही खंत व्यक्त करण्याची सोय नाही.. खुपत असूनही सांगायचे नाही.. दिसत असूनही पहायचे नाही अशी अगतिकता जाणवू लागते.

ही स्थिती केव्हा संपेल असा प्रश्न कविमनाला पोखरून काढतो.. (ही ऱ्हासाची रजनी केव्हा जाईल विरूनि साची ? स्वतंत्रतेची पहाट ती येईल – उत्कर्षाचा दिन केव्हा सुचविल ?) स्वातंत्र्याविषयीची अनिवार तितीक्षा त्यातून प्रगट होते. या संदर्भात वि. स. खांडेकर म्हणतात "वैयक्तिक दुःखाने एकीकडे व्याकुळ होत असतांना दुसरीकडे सर्व सामाजिक दुःखाची जाणीव त्यांना सतत टोचत राहिली. हळूहळू तिचे तीव्र आंचेत रूपांतर झाले. देशाचे राजकीय पारतंत्र्य त्यांच्या मनाला बोचत होते" पारतंत्र्याबरोबर सामाजिक दुःखानेही केशवसुत कळवळतात. मानवा-मानवातील विषमतेचा ते तीव्रपणे निषेध करतात. गरीब – श्रीमंत यांच्यातील भेद, अंत्यजांना मिळणारी निंद्य वागणूक, कष्ट करूनही मजुराची होणारी उपासमार त्यांना असह्य होते. त्याचवेळी समाजातील रूढीचे मूर्तिभंजन करतांना विध्वंसन हे विधायक कार्याकरिता करायचे असते हे ते विसरत नाहीत. रुढीग्रस्त झालेल्या, निद्रिस्त असलेल्या समाजाला जागृत करण्यासाठी 'नव्या शिपायाला' घेऊन 'तुतारी' फंकत 'गोफण' फिरवत आवेगाने पुढे सरसावणारे केशवसुत–

'अमुचा पेला दुःखाचा–
डोळे मिटुनी प्यायाचा'

असे एकाएकी का उद्‌गारतात याचे अनेकांना नवल वाटते.

काही समीक्षकांनी याचा संबंध केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वाशी जोडला आहे. " सामाजिक स्वरूपाच्या कवितांत केशवसुत कणखर, युयुत्सु वृत्ती धारण करतात तर वैयक्तिक जीवनाच्या संबंधात नैराश्याचा आविष्कार करतात" असे रा. श्री. जोग म्हणतात. तर "त्यांचे व्यक्तिमत्त्व दुभंगले होते की दुहेरी ?" असा प्रश्न वि. स. खांडेकर उपस्थित करतात.

केशवसुतांच्या जीवनातील घटनांचा धांडोळा घेत गेलो की त्यांच्या वृत्तीविषयक काही पुरावे हाती लागतात. प्रत्येकच कलावंताच्या कृतीवर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेला असतो. केशवसुतांच्या कवितेवरही तो उमटलेला दृग्गोचर होतो. कृष्णाजी केशव लहानपणी अशक्त, किरकिरे होते, एककल्ली, मुग्ध, एकलकोंडा, मुखदुर्बळ वाटणारा त्यांचा स्वभाव असल्याचे त्यांचे बंधू सी. के. दामले यांनी नमूद केले आहे. केशवसुतांनीही 'नैऋत्येकडला वारा' या कवितेत उल्लेख केला आहे. तर दुर्मुखलेल्या,अबोल वृत्तीचा उल्लेख 'दुर्मुखलेला'या कवितेत आला आहे. शिक्षकाने 'दुर्मुखलेला' म्हणून केलेली हेटाळणी केशवसुतांच्या जिव्हारी लागलेली आहे. त्या प्रसंगाचे पडसाद या कवितेत उमटले आहेत. 'आज दुर्मुखलेले हे तोंड उद्या नवी काव्ये गाईल' असा जबरदस्त आत्मविश्वास त्यातून व्यक्त झाला आहे.

हा आत्मविश्वास फोल नसल्याचे त्यांच्या काव्यातून प्रत्ययाला आलेच आहे. परंतु शिक्षकाने सगळ्यांसमोर केलेल्या हेटाळणीची जखम शेवटपर्यंत त्यांच्या मनात वाहती असावी. १९०२ मध्ये, मातोश्रींच्या निधनामुळे उज्जैनला जमलेल्या सर्व कुटुंबियांचे एकत्र छायाचित्र काढायचे ठरले तेव्हा 'आमच्या सारख्याचा' फोटो काय करायचा आहे?' असे म्हणून त्यांनी छायाचित्र काढणे टाळले. या घटनेमागे तेच कारण असावे. शिक्षकाचे ते शब्द त्यांचा सतत पाठलाग तर करीत नव्हते ना? तो घाव जिव्हारी बसला असावा. अन्यथा केशवसुतांनी आपल्या शिक्षकाला अतिशय उद्दाम, गर्वाचा वास असलेले उत्तर - कवितेतून का होईना - दिले नसते. केशवसुतांचा स्वभाव मानी, घुमा-कुढा होता. अशी माणसे सहसा आपला अपमान विसरत नाहीत.

कुटुंबापासून दुरावल्याची खंत

केशवसुत संतापी असले तरी अतिशय हळवे होते. आपल्या कुटुंबियाविषयी अत्यंत प्रेम त्यांच्या अंत:करणात वसत होते. त्यांच्यासाठी आपण काही करू शकत नाही याची खंत त्यांना पोळून काढत होती. 'गोष्टी घराकडील...' या कवितेत त्याचे स्पष्ट प्रतिबिंब उमटलेले आहे. आपल्यासाठी खस्ता खाणाऱ्या आईवडिलांसाठी आपण काहीच करू शकलो नाही याचे अतिशय दु:ख त्यांना होते. त्यांच्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलो नाही, उलट आपण संतापलो याची मन पोखरून टाकणारी खंत 'सिंहावलोकन' या कवितेत स्पष्टपणे व्यक्त झाली आहे. आपल्या कल्याणाची चिंता वाहणाऱ्या आईचे निधन झाल्याचे कळताच त्यांचे हृदय पिळवटून निघते.

आप्त स्वकीयांना सोडून दूर जातांना कवी विलक्षण भावविव्हल होतो. मायेचे, प्रेमाचे पाश त्याला गुरफटवून टाकतात. ते पाश बाजूला सारतांना तो वेदनांनी अगतिक होतो. 'वाटे नाटक शोकसंकुल असे जीवित्व हे याजला' अशी त्याची अवस्था होते. आपल्या सगळ्या आप्तेष्टांना सोडून, केशवसुतांना पोटासाठी वणवण फिरावे लागले. संवेदनशील मन त्यामुळे उदास होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे सगळे जग आनंदोत्सवात मग्न असतांना एकाकीपणाची जाणीव तीव्र होते. उदासीनता अधिकच गडद होते. त्यांना पत्नी आठवते तिला निरोप देतांनाचा प्रसंग आठवतो 'प्रियेचे ध्यान' करता करता सगळ्या आठवणी फुलून येतात. शरीराने दूर असलो तरी 'मनाने आपण प्रियेजवळच असू' अशी प्रियेची काढलेली समजूत त्यांना आठवते... हळवे मन अधिकच उदास होते.

केशवसुतांचे लग्न वयाच्या पंधराव्या वर्षी झाले होते. नोकरीला लागल्यानंतर त्यांनी स्वतंत्र बिऱ्हाड करावे असा लकडा त्यांच्या वडिलांनी लावला होता. वडिलाच्या मृत्यूनंतर केशवसुतांनी मुंबईला बिऱ्हाड केले. मिळणाऱ्या तुटपुंज्या पगारात कसेबसे जगत असतांना काव्य देवतेची आराधना अतिशय निष्ठेने सुरू होती. त्यावरून केशवसुतांना आप्तस्वकीयांची दूषणे ऐकावी लागलीत.. पोटासाठी वणवणतांना काव्योपासनेला पुरेसा वेळ देता येत नाही ही खंत लागलेली असते. या सर्व धकाधकीतून स्वत:ला सावरीत, महत्प्रयासाने आपण जे काव्य लिहिले त्याची उपेक्षा होत असल्याचे पाहून त्यांचे हळवे मन कळवळते '...जन तया धिक्कारिती हा ! कसे ?' ही खंत वाढत राहते.

रसिकांच्या औदासीन्याने निराशा-

आपल्या कवितेची पुरेशी बूज राखली जात नाही याची खंत केशवसुतांना होती असे सी. के. दामले एका आठवणीद्वारे सूचित करतात. 'कवित्वाच्या दिव्यत्वाविषयी कितीही आत्मविश्वासयुक्त तीव्र जाणीव कवीजवळ असली तरी ते रसिकांच्या औदासीन्याने हीनत्व पावते' असेच केशवसुतांना वाटत असल्याचे त्र्यं. वि. सरदेशमुख म्हणतात. म्हणजे आपल्या कवितेची योग्य ती दखल घेतली जात नाही या विचाराने, अगोदरच विषण्ण असणारी कवीची वृत्ती अधिकच विषण्ण झाली

असावी. ज्या कवितेपायी सगळ्या लौकिकाचा त्याग केला ती काव्यदेवताही अंतरल्याची खंत व्यक्त होते. ज्या कवितेच्या नादामुळे आप्तेष्टांनी दूषणे दिलीत 'मास्तर भ्रमिष्ट आहेत' असे अहेर सहकाऱ्यांकडून मिळालेत, जिच्यासाठी वणवण करीत हे सगळे सोसले, ती काव्यदेवता अंतरल्याच्या जाणिवेने केशवसुत तिच्यावर 'फिर्याद' करतात.

प. चिं. दामले यांची विनंती

केशवसुतांचा स्वभाव अतिशय मानी होता. आर्थिक अडचणींमध्ये हातभार म्हणून बंधूंनी देऊ केलेली मदतही त्यांनी परत केली. उलट त्याही परिस्थितीत ते इतरांना मदत करीत व लोक त्यांच्या स्वभावाचा फायदा घेऊन त्यांना फसवित असत असे सी. के. दामले सांगतात. तर केशवसुतांची सांपत्तिक स्थिती सी. के. दामले म्हणतात 'तशी' हलाखीची नव्हती, असे केशवसुतांचे पुतणे प. चिं. दामले म्हणतात. केशवसुतांच्या काव्यातील निराशेचा, त्यांच्या सांपत्तिक स्थितीशी संबंध नाही असे ते म्हणतात...' केशवसुत गरीब होते, पण 'गरिबी' आणि 'दारिद्र्य' यात अंतर आहे. खेरीज, मनाने ते श्रीमंतच होते... केशवसुतांचे काव्य जर नीट समजून घ्यायचे असेल, तर त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा त्यांच्या काव्यावर परिणाम झाला असे कोणीही समजू नये. उलट गरिबी ही त्यांनी आनंदाने व स्वखुषीने पत्करलेले व्रत आहे. असे प. चिं. दामले नमूद करतात. तो संबंध न जोडण्याची विनंतीही ते अभ्यासकांना करतात. असे असले तरी शेवट पर्यंत केशवसुतांची परिस्थिती बेतासबात होती. व त्याच्या झळा हळव्या मनाला लागल्या नसतीलच असे नाही.

मुक्तिबोध यांचे मत

'केशवसुतांच्या काव्यातील नैराश्य आर्थिक दुरावस्थेतून निर्माण झाले नसून भांडवलशाही समाज रचनेतील ध्येयवादी माणसाच्या वाट्याला आलेल्या एकाकीपणातून उद्‌भवल्याचे' मत शरदच्चंद्र मुक्तिबोध व्यक्त करतात. तर केशवसुतांच्या कवी आणि काव्यविषयक कवितांकडे लक्ष वेधत, निराशेसंबंधी विवेचन करतांना डॉ. द. भि. कुळकर्णी म्हणतात '..पाश्चिमात्य कवींचे अनुकरण किंवा आर्थिक विपन्नावस्था इत्यादी कारणांनी केशवसुतांच्या काव्यात निराशा निर्माण झाली नाही; तर काव्य व कवी यांच्या स्वरूपाविषयी अत्यंत उच्च कल्पना मनात बाळगल्याने आणि त्या तुलनेने आपले काव्य डावे ठरते या जाणिवेने केशवसुतांच्या काव्यात दुःख, नैराश्य याचे दर्शन घडते'

'कविता म्हणजे आकाशाची वीज'

केशवसुतांची काव्यविषयक निष्ठा अचल होती. कवीवर, काव्यविषयक कोणतीच बंधने नसावीत हे त्यांचे मत सर्वश्रुतच आहे. कवितेचे आराधन म्हणजे एक व्रत आहे. जे हे व्रत घेतात त्यांना वेळप्रसंगी होरपळून निघावे लागते असा स्वानुभव केशवसुत कथन करतात. आनंदीरमण यांना लिहिलेल्या पत्रात 'कविता म्हणजे आकाशाची वीज आहे. ती धरू पाहणारे शेकडा ९९ आपणास होरपळून मात्र घेतात. मी अशा ९९ वा पैकीच आहे असे नमूद करतात.

काव्यशक्तीच्या अतिआत्मविश्वासातून नैराश्य–

केशवसुतांच्या काव्यातील नैराश्य हे त्यांच्या प्रचंड आत्मविश्वासातून निर्माण झाले असून स्वतःच्या काव्यशक्ती बद्दल इतका अतिशयोक्त अभिमान बाळगणे ही विकृती असल्याचे ह. श्री. शेणोलीकर म्हणतात. ''केशवसुत ईर्ष्येने पद्यरचना करू लागले. त्यात थोडीशी गती प्राप्त होताच भलत्या आकांक्षेच्या भरी पडले, ती आकांक्षा पुरी होत नाही असे पाहून 'भिकार या जगती इच्छित न मिळे काही' असे म्हणून निराशा झाले'' असे विवेचन ह. श्री. शेणोलीकर करतात. एकूणच शेणोलीकरांचे विवेचन केशवसुतांवर अन्याय करणारे आहे.

अनुक्रमणिका

निसर्गासमोर थिटेपणाची जाणीव

पाश्चात्य वाङ्मयाच्या अध्ययानाने अनेक बाबीतल्या नवेपणाने केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वावर गडद ठसा उमटविला आहे. त्यामुळे निसर्गाकडे पाहण्याचा परंपरागत दृष्टिकोण, केशवसुतांच्या कवितेने सर्वांशाने बदललेला दिसतो. निसर्गातील चैतन्याला कवितेत सर्वप्रथम स्थान केशवसुतांनी दिले. हा निसर्गच कित्येक वेळा त्यांच्या मन; संवेदनांचाही वाहक ठरला आहे. निसर्गात भव्यत्वाचा, दिव्यत्वाचा, पूर्णत्वाचा साक्षात्कार तर त्यांना होताच पण त्याच बरोबर मानवी जीवनातल्या अपूर्णतेची, क्षुद्रतेची, करंटपणाची जाणीव त्यांचे मन विकल करते. या निसर्गाजवळ केशवसुतांनी अनेकदा मन पूर्णपणे मोकळे केले आहे. सृष्टीत वसणारे अढळ सौंदर्य; सृष्टीच्या सहवासात प्रीती, चारुता, आनंद यांची येणारी अलौकिक प्रतीती केशवसुत व्यक्त करतात. 'चिरतरूण-चिररुचिर पुष्प, सृष्टीचा आनंद कंद चाखणारा भृंगा, चिरकाल आनंदी वृत्ती लाभलेले फुलपाखरू आदींशी मन तुलना करायला लागते. 'उद्या' च्या विचाराने मात्र आपल्याला ही आनंदीवृत्ती जोपासता येत नाही, दिव्यत्वाची प्रतीती येऊनही आपल्या अपूर्णतेने त्याला कवटाळता येत नाही याची खंत केशवसुत व्यक्त करतात. या पृथ्वीला 'स्वर्गसमक्षता' आणण्याची मनीषा केशवसुत कवितेतून व्यक्त करतात. 'स्वर्गसमक्षता' हे केशवसुतांचे एक स्वप्न आहे. प्रयत्न करूनही ते साकार होत नाही याची खंत त्यांच्या मनात सलत राहते. 'आत्मारा'' आणि 'आका' च्या द्वंद्वात जीवनातला 'स्वर्ग'च नाहीसा होतो. अशावेळी आपण उगीच मोठे झालो याचा सल वाढत जातो. 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे' मनाची अशी समजूत कवी वारंवार घालतो. पण 'शैशव' जपताच येत नाही. मुठीतून वाळू निसटून जावी तसे ते निसटून जाते. मनाची उभारीच उध्वस्त करणारी, दु:खाचे निदान असलेली 'प्रौढत्वाची विकलांग जाणीव' तेवढी उरते. कविमन आक्रंदायला लागते. आशा निराशेचं चक्र फिरत राहते...जीवनाचं श्रेय गवसले आहे... हाती आले आहे असे वाटता वाटताच ते निसटून जाते. त्यामुळे कवी मनाची काहाली अधिकच वाढते.

'मज पासोनी,
हाय ! हिरोनी
नेले कोणी !
म्हणुनि जीव पाखडितसे,
न परि हरपले ते गवसे.'...कविमन आक्रंदायला लागते.

हृदय फाटले आहे

हृदय भंगले आहे.... संजीवनी कुठे ? पण जीव पाखडूनही आता काही उपाय नसतो. मन विषण्ण करणारी, हरलेपणाची जाणीव फक्त उरते. त्या जाणिवेसरशी 'हृदय उलू' लागते. हृदय उलगडण्याचा... अनुभव केशवसुतांनी जागेपणी घेतला आहे. म्हणूनच आपले मित्र किरात यांना पाठविलेल्या पत्रात केशवसुत लिहितात-

'You can guess my state of mind from my piece in the last issue of Manoranjan. A crack in the heart ! But, alas ! where is the restrorative.'

'हृदय फाटले आहे... संजीवनी कुठे आहे ?'- केशवसुत आर्ततेने विचारता. 'संजीवनी' कधीच गवसत नाही याची जाणीव त्यांना आहे. पण तरीही हृदय पिळवटून आर्तपणे ते विचारतात. केशवसुतांच्या आर्ततेत मानवी जीवनाची शोकांतिका सामावलेली आहे.

भान असलेले केशवसुत आपल्याला आठवतात आणि मग निराशेमागील वर आलेली कारणेही अपुरी व वरवरची वाटू लागतात. 'नवी काव्ये' लिहिण्याचे जीवित ध्येय स्वीकारलेल्या केशवसुतांना आर्थिक वा भौतिक विवंचनांची तमा वाटत नव्हती, हे खरे असले तरी शेवटी केशवसुत हेही एक 'माणूस' आहेत, आणि त्यांच्या माणूसपणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. हे लक्षात घेतले की आणखी काही

अस्पर्श तथ्ये हाती येतात.

शिक्षणासाठी – पुढे येण्यासाठी सर्वच भावंडांना अपार कष्ट करावे लागले. बडोद्याला श्रीधरपंताकडे केशवसुत शिक्षणासाठी गेले खरे. पण श्रीधरपंतांच्या आकस्मिक निधनामुळे अकरा महिन्यातच त्यांना परत यावे लागले. ''यापेक्षा आमचा कुशा चांगल्या कविता करतो'' – म्हणूनच कौतुक करणारा (इतरांनी याच केशवसुतांना वेडा म्हणून हिणविले), कुटुंबाची सगळी भिस्त ज्याच्यावर आहे असा हा आधारवड कोसळला. त्याची खोल जखम केशवसुतांच्या अंतर्मनात झालीच असली पाहिजे. बडोद्याहून आल्यानंतर केशवसुत व मोरोपंत नागपूरला शिकायला गेले. केशवसुत तीन चार महिन्यातच परत फिरले. मोरोपंत अमरावतीला गेले. वार लावून शिकले. मोठे झाले. पुढे केशवसुतांना आर्थिक मदत करण्याची कुवत त्यांच्यात आली.

पण केशवसुतांचे काय? नागपूरहून परतल्यानंतर एक वर्ष घरी काढून पुण्याला शिक्षणासाठी गेलेला कृष्णा वर्गात आगरकर – टिळक या शिक्षकांची चित्रे काढीत बसतो. चित्रकलेत तो फारसा प्रवीण नसतो. मोठ्या प्रयासाने तो मॅट्रिक होतो. या लौकिक वाटणाऱ्या घटनांचीही दखल घेणे आवश्यक आहे.

केशवसुतांचे अथपासूनचे आयुष्य तपासत गेलो की त्यांच्या जन्मजात पिंडाची ओळख पटते. जे वाट्याला आले ते आपणच निर्माण केले आणि म्हणूनच स्वीकारलेही गेले. जीवनात सर्वच क्षण सारखे नसतात. म्हणूनच नैराश्याने टाहो फोडणारे मन जीवनातील शाश्वततेचीही गीते गात असते. त्यात चक्रावून जाण्यासारखेही काही नसते. ही दोन्ही त्याचीच रूपे असतात. कवितानिर्मिती ही प्रदीर्घ काळ चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे कविता लेखनाच्यां कालखंडावरून त्याच्या निर्मात्याची मन:स्थिती ठरविणे हाही एक चकवा ठरतो. म्हणूनच सुट्या कविता वा काव्यपंक्तींचा विचार न करता त्या कवीचा समग्र पिंड पाहत गेलो की हे सगळे माणूस म्हणून वाट्याला येणे कसे अपरिहार्य होते ते लक्षात येते. व 'काट्यावाचून गुलाब नाही' असे म्हणणारे आणि 'मृत आशाच्या चितेवरून' म्हणणारे केशवसुत वेगळे नाहीत, दुभंगलेले तर नाहीतच हेही लक्षात येते.

जे आहे ते केशवसुतांनी निमूटपणे स्वीकारले होते. ज्या बाणेदारपणे त्यांनी गुरुवर्याबद्दल उद्‌गार काढले होते त्याच ताठपणे ते पुढेही जगत राहिले. कुणाचीही मदत घेणे नाकारत राहिले. जे प्राप्त झाले त्याचे कर्ते सर्वस्वी तेच होते. लहानपणी किरकिरे असलेल्या, शिक्षणात फारसे लक्ष नसलेल्या, जे प्राप्त झाले ते स्वीकारून आकाशीची 'खपुष्पे' इतरांसाठी तोडून आणणाऱ्या आणि पृथ्वीला 'सुरम्य स्वर्गा सम' बनविण्याची अभिलाषा काव्यातून का होईना, बाळगणाऱ्या केशवसुत नावाच्या माणसाच्या आयुष्याचा हा आलेख असतो. शिक्षणासाठी केशवसुत श्रीधरपंताकडे मोठ्या उमेदीने गेले. पण दहा अकरा महिन्यातच त्यांना परतावे लागले. श्रीधरपंताच्या मृत्यूचा त्यांच्या वडिलांवर आघात झाल्याचे वर्णन आहे. पण एक दीड वर्षापूर्वीच लग्न झालेल्या श्रीधरपंताच्या विधवेचे काय? एक दोन महिन्याच्या अपत्याचे काय? त्या विधवा स्त्रीची काय अवस्था झाली असेल? की तत्कालीन समाजरूढीचा तो एक भाग म्हणून कुणालाही विचार करावासा वाटत नाही? पुढे सामाजिक रूढी, विषमतेने कळवळून लिहिणाऱ्या केशवसुतांना त्याचे काही वाटले नसेल?

'नाही' असे म्हणता येत नाही. १९०५ मध्ये, आयुष्याच्या अखेरीला केशवसुतांनी 'हरपले श्रेय' ही कविता लिहिली. 'चिपळूणला असतांना शेजारी एक परित्यक्ता, दु:खी स्त्री कवीने पाहिली. तिच्या दु:खामुळे या कवितेच्या रचनेला चालना मिळाली' असे समीक्षक नमूद करतात. पण ह्याही प्रसंगाचे मूळ श्रीधरपंताच्या मृत्यूनंतरच्या घटनेतच असले पाहिजे. केशवसुतांच्या आयुष्याला कायमचा काचा पाडणारी ही घटना नजरेआड करता येत नाही. श्रीधरपंताच्या आकस्मिक मृत्यूचा केशवसुतांच्या मनावर खोल आघात झाला असणार. त्यांच्या समोर,

ती विधवा हतभागिनी जगत होती. घरातच एक जिवंत मरण वावरत असतांना केशवसुतांसारख्या संवेदनशील माणसावर त्याचा परिणाम झाला असणारच. त्याचा प्रत्ययही केशवसुतांच्या वर्तनातून येतो. श्रीधरपंताच्या मृत्यूच्या आघातामुळे केशवसुतांमध्ये विलक्षण अस्वस्थता निर्माण झाली. ते नागपूरला गेले खरे पण रमले नाहीत. रमणे शक्यही नव्हते. त्यामुळे ते घरी परतले. एक वर्ष घरी काढतांना श्रीधरपंतांच्या विधवेचे अन् अपत्याचे निधन त्यांनी अनुभवले. ते पुण्याला आले. वर्गात टिळक-आगरकरांसारखे गुरुवर्य शिकवीत असतांना ते चित्रे काढीत होते. चित्रे काढण्याची ही कृती निरर्थक नाही. समोर सुरू असलेल्या विषयाशी मन समरसच होत नाही. कारण चित्त थाऱ्यावर नाही. त्या अस्वस्थ मनाचा चाळा म्हणून चित्रे काढली जात आहेत. अशा अवस्थेत कोणी 'दुर्मुखलेला' म्हणून संभावना करीत असेल तर तो घावही जिव्हारी लागणारच. स्वतः अंतर्यामी कायमचे जखमी झालेल्या केशवसुतांना अतीत आणि वास्तवाशी संघर्ष करीत पुढे जावे लागले. केशवसुत आपल्या आयुष्यातील अशा अनेक दुखऱ्या गोष्टींना विसरू शकले नाहीत. म्हणूनच सर्वसामान्य दिवाळीत मश्गुल असताना हा जीव मात्र एकटा दूर जाऊन बसतो. या सर्व बाबींचा विचार केला की केशवसुतांच्या दुर्दम्य आशावादाचा आणि आत्यंतिक नैराश्याचाही उलगडा होतो. या सर्व गुंत्यातून सुटण्याच्या धडपडीतून उमेदीने उभे राहण्याचा प्रयत्न मन करते खरे. पण वास्तव जग त्याला समजून घ्यायला तयार नाही, त्यामुळे उरते फक्त पराभवाची जाणीव आणि हरपल्या श्रेयाची वेदना.

केशवसुत भारतीय संस्कृतीत जन्माला आलेले आहेत. त्यामुळे सर्वत्र 'काळोख' दाटून येतो तेव्हा परंपरागत 'देव' नावाचा एक 'किरण' दिलासा देत असतो. केशवसुतही अशा काळोख्या मनःस्थितीत या 'किरणा'चा आधार घेऊ पाहतात. पण 'पिंड' आड येतो आणि उरते ती प्रचंड जीव घेणी निराशा. मग त्या किरणाची आशा बाळगणे ही 'भिक्षांदेही' वाटायला लागते. ते स्वाभाविकही असते. कारण हा एक संवेदनशील माणसाच्या जीवनाचा प्रवास असतो आणि हा प्रवास संपणार असतो तो फक्त त्याच्या मृत्यूने !

❑❑❑

संदर्भ :

१. भ. श्री. पंडित 'केशवसुतांच्या कवितेतील विराग' केशवसुत-पाच चिंतनिका, महाराष्ट्र प्रकाशन, अमरावती प. आ. १९६१, पृ. ६८
२. रा. श्री. जोग : केशवसुत काव्यदर्शन, व्हीनस प्रकाशन, पुणे, दु. आ. पृ. ९३
३. रा. श्री. जोग हरपले श्रेय, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे. प. आ. १९५६ पृ.२७
४. वि. स. खांडेकर केशवसुत- काव्य आणि कला. रा. ज. देशमुख आणि कंपनी पुणे, दु. आ. १९५९, प्रस्तावना - पृ.६२
५. त्र्यं. वि. सरदेशमुख कोसळते आभाळ, अंधार यात्रा, मौज प्रकाशन गृहमुंबई, प. आ. १९६८, पृ. ७
६. सी. के. दामले : केशवसुतांचे त्रोटक चरित्र, केशवसुतर स्मृतिग्रंथ, संपा. प्रका. -प. चिं. दामले, पृ. २१४
७. प. चिं. दामले केशवसुत काही स्मृति, केशवसुत स्मृति ग्रंथ, उ. नि. पृ.२२४
८. शरश्चंद्र मुक्तिबोध केशवसुतांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची निराशा, केशवसुत समीक्षा-१९०६ ते १९५६, संपा. प्रा. गजानन जोशी, श्री लेखन वाचन भांडार, पुणे, प. आ. १९६६ पृ.३९३
९. द. भि. कुळकर्णी : केशवसुतांची निराशा नवभारत, वाई, जानेवारी १९५६ पृ.३०
१०. ह. श्री. शेणोलीकर कवि केशवसुतः एक बाजू, केशवसुत समीक्षा, उनि. पृ.३०३
११. दि. के. बेडेकर हरपले श्रेय, केशवसुतांची काव्यदृष्टी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प.आ. १९६६ पृ.३९

।। पाऊस ।।

। पराग घोंगे

दिशानी घड्याळात नजर टाकली. आठ वाजायला आले होते. अजून वीस मिनिटात शेवटच्या पेशंटचं ट्रॅक्शन संपेल. मग ती मोकळी. मग एकटीनं घरी जायचं. कुलूप काढायचं. सकाळचा स्वयंपाक असलाच तर जेवून टाकायचं. नाहीतर काहीतरी करायचं. स्वत:साठी, स्वत:पुरतं. कधी नुसताच भात, कधी खिचडी, कधी आमलेट, कधी थालीपीठ ! मग अगदी ठरल्यासारखा मुंबईहून बहिणीचा फोन येणार. त्यावर दिवसभराच्या शिळोप्याच्या गप्पा होणार. मग त्याचा फोन. आणि रात्री पंख्याखाली कॉट ओढून एकटीनंच निजणं. पुन्हा सकाळ. पेशंटस् व्हिजिटस, सेंटर आणि संध्याकाळचं क्लिनिक ! एका चक्राला बांधल्यासारखं तेच आणि तसंच जगणं !

'मॅडम, ट्रॅक्शन काढायचं का ?

पेशंटच्या आवाजानं ती भानावर आली. तिने लगबगीनं ट्रॅक्शनला लावलेली वजनं काढली. पेशंटकडे बघून ती अपराधी हसली. त्याच्या दंडावर दिशानं थोपटलं.

'बरं वाटतंय आता' पेशंट तिच्या हलक्या स्पर्शानं सुखावून हळूच म्हणाला.

तो शेवटचा पेशंट असल्यामळे मग तिने एकदम आवरायला घेतलं. खरं तर हे क्लिनिक शहरातील नामवंत सर्जन आलोक मेहतांचं होतं. आलोक मेहता म्हणजे आर्थोपिडिक सर्जरीतले किंग ! शहरातल्या मध्यवर्ती भागातलं त्यांचं मेहता हॉस्पिटल चांगलंच प्रसिद्ध होतं. मेहतांच्या हातात जादू होती. त्यांची लांबसडक निमुळती बोटं तिला खूप आवडायचीत. तिला वाटायचं ही तर कलावंताची बोटं आहेत. कधी कधी मेहता सर टेबलावर उगाचच बोटं फिरवत बसायचे. आणि ती त्यांच्याकडे पापणीही न मिटता बघत बसायची. तिला नकळत त्यातून पियानोचे स्वर ऐकू यायचे. सरांचं व्यक्तिमत्व, त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचं मस्तवाल जगणं, यांचं तिला मनस्वी अप्रूप होतं.

दिशा निघाली तेव्हा बाहेर चांगलाच पाऊस सुरू होता. तिनं निघतांना मेहता सरांच्या केबिनकडे सहज नजर टाकली. आजही सर लौकर निघून गेले होते. अलिकडे त्यांचा हॉस्पिटलमधला रस खूपच कमी झाला होता. कधीतरी यावर तिला सरांशी बोलायचं होतं. सरांनी लक्ष काढल्यामुळे स्टाफ बेशिस्त होत चालला होता. हॉस्पिटलची साफ सफाई नीट होत नव्हती. अॅडमिट असलेल्या पेशंटकडे नर्सेस, वॉर्ड बॉईज अक्षम्य दुर्लक्ष करत होते. दिशाला याचा त्रास व्हायचा. खरं तर ती फिजिओ थेरपिस्ट म्हणून तिथे काम करत होती. सर्व्हायकल, लंबर स्पाँडिलायसीसच्या, बाह्य रुग्णांना थेरपी देणं, आणि अॅक्सीडेंटल केसेसचं, पोस्ट ऑपरेशनल रिहॅबिलीटेशन हे काम तिच्याकडे होतं.

दिशा तिच्या थेरपी युनिटची इनचार्ज होती. तिच्या कामात मेहता सरांचीसुद्धा ढवळाढवळ

नसायची. त्यामुळे ती आपलं काम अधिकच जबाबदारीनं करायची. तिला हॉस्पिटलच्या स्टाफच्या रुग्णांविषयीच्या अनास्थेचा मनस्वी तिटकारा यायचा. अप्रामाणिकपणे काम करणारी माणसं तिला खपत नव्हती. ती स्वत: मोबदल्याचा विचार न करता अतिशय निष्ठेनी काम करायची. त्यामुळे असेल कदाचित, तिची कधी कधी चिडचिड व्हायची. आणि या गोंधळाला स्वत: सरच जबाबदार आहेत. असं अलिकडे तिचं ठाम मत झालं होतं. म्हणून तिला सरांशी बोलायचं होतं. मेहता हॉस्पिटलमध्ये दिशा फक्त दोनच तास काम करायची. संध्याकाळी सहा ते आठ दोन तासांच्या कामाचे फार पैसेही तिला मिळत नसत. पण तिथल्या छोट्याशा फिजिओथेरपीच्या युनिटने तिच्या मनाचा एक भाग पूर्णपणे व्यापला होता. मेहतांपेक्षांही हॉस्पीटलच्या या भागावर तिचे अधिक प्रेम होते. या हक्कानी ती त्यांना बोलणार होती.

सकाळी आवरासावर करून ती निघाली. पायऱ्यात निलेश तिची वाट बघत उभा होता. तिला खूपच आश्चर्य वाटले. ती आनंदानं चित्कारलीच.

'तू ? काही फोन नाही, निरोप नाही' ती आनंदानं जवळ जवळ त्याला बिलगलीच. आधी फोन केला असता तर हे सगळे मिस नसतं का केलं मी', त्यानीही तिला जवळ ओढत म्हटले.

मग दोघांनीही भान येऊन अवती भवती बघितले. पायऱ्यांमध्ये जरासा अंधार होता. आणि भोवताल त्यांना बघणारे कुणीच नव्हते. दोघंही मग हात धरून उरलेल्या पायऱ्या उतरले. अचानक दिशाचा मूड बदलला होता. आता ती हॉस्पिटलच्या फिजीओथेरपी युनिटची इन्चार्ज नव्हती. ती निलेशची अभिसारिका होती. तिचं मन एकदम हलकं झालं आणि पावलं तरंगू लागली. निलेश तिला या हॉस्पिटलमध्येच भेटला होता. तेव्हा तो पाठदुखीने त्रस्त होता. आणि कुणीतरी मेहता सरांचे नांव सुचवल्यामुळे दिशाच्या युनिटमध्ये दाखल झाला होता. सावळाच पण तरतरीत निलेश दिशाला बघताक्षणीच आवडला होता. सुरुवातीच्या काळात तो अगदी स्वत:तच हरपलेला असे. मग दिशानंच त्याला हळूहळू बोलतं केलं होतं. तो मुंबईहून आला होता. साहजिकच दिशाला उत्सुकता होती. मुंबईचा सिव्हील इंजिनिअर माणूस अचानक वयाच्या तिशीत नागपूरसारख्या शहरात आल्यामुळे तिला आश्चर्य वाटलं होतं.

'काही प्रेमभंग वगैरे नाही ना ?' तिनी एक दिवस त्याच्याकडून व्यायाम करून घेतांना त्याला विचारलं होतं.

'हो. तसंच काही समजा' निलेशनेही मोकळी कबुली दिली.

दिशाला हे फारच आवडलं होतं. मग एक दिवस तिनेच क्लिनिक बंद झाल्यावर त्याला कॉफी ऑफर केली. दोघंही समोरच्याच कॅफिटेरियात गेलीत. रात्री शहर दिव्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघाले होते. पण कॅफेत मात्र माफक उजेड होता. प्रकाशात हळूहळू निलेशनंच तिला त्याची स्टोरी सांगितली.

परजातीय प्रणालीवर त्याचे प्रेम होते. खूप लहानपणापासून! एकत्र खेळलीत. एकत्रच लहानाची मोठी झालीत. बाहुला बाहुलीच्या खेळात ती दोघं बाहुल्यांचे आई बाबा झालीत. आणि वयात आल्यावर एकमेकांच्या प्रेमात पडलीत. मग त्यानं तिला प्रपोज केलं. दोन्ही कुटुंबांनीही थोड्या कुरबुरीनंतर या प्रेमाला मान्यता दिली. साखरपुडा ठरला. निलेशच्या आईबाबांनी उत्साहानं तिच्यासाठी दागदागिने घेतले. आणि अचानक एक दिवस मुलीच्या मामानी मुलीसाठी सधन स्थळ आणले. मुलगा दिसायला उत्तम होता. त्यांचा वडिलोपार्जित मोठा बिझिनेस होता. शिवाय दोघांचेही जात आणि धर्म एकच होते. आधी मुलीचे आईवडील हुरळले. मग मुलगीही पालटली. प्रेमापलिकडे जगण्यासाठी वेगळेच आणि खूप महत्त्वाचे काहीतरी लागते, याची आईवडिलांनी मुलीची खातरजमा करवून दिली. मग तिनंही हे प्रेमसंबंध तोडण्याचा निर्णय घेतला. निलेशच्या पायाखालची जमीन सरकली. त्याने परोपरीने तिला विनवून बघितले.

जीव देण्याची धमकी दिली. पण ती बधली नाही.

'आपल्यात संस्कारांची न भरून येणारी दरी आहे' तिनं तोडण्याचे कारण सांगितले.

'बालपणापासून आपण एकत्रच तर राहिलोत. आपल्यावर या महानगरानीच संस्कार केले. आपल्या आवडीनिवडी, आपली सुख-दु:खं सतत आपल्या जगण्याशीच तर निगडीत होती' त्यानं निकराचा प्रयत्न करून बघितला.

पण ती ठाम होती. ती काहीही समजण्याच्या पलिकडे निघून गेली होती.

मग त्यानं एक दिवस मध्यरात्री झोपेच्या ५० गोळ्या गिळल्या. सहा दिवस तो कोमात होता. कसाबसा या अपघातातून तो वाचला. निलेशच्या आईवडिलांचे धाबे दणाणले. त्यांनी मग त्याला नागपूरला पाठवण्याचा निर्णय घेतला.

दोन कप कॉफी पीत त्यानं याच कॅफेत ही कथा दिशाला सांगितली होती. दिशा आतपर्यंत हलली होती. तिने हलकेच त्याचा हात आपल्या हातात घेतला होता. आणि दोघे खूप वेळ तसेच भान हरविल्यासारखे बसून राहिले होते. जणू भोवतीचा काळ अचानक स्तब्ध झाला होता. दिशाला आजही कॉफी पिता पिता सगळे आठवले !

'किती दिवस झालेत', दिशाला वाटले.

'कसला विचार चाललाय एवढा ?' निलेशनी दिशाची तंद्री मोडली.

'आपल्या आजवरच्या भेटींची उजळणी करतेय.' दिशा त्याच्या डोळ्यांत खोल बघत बोलली. 'उगाच डोकं शिणवत बसतेस.' निलेश नाराजीनं बोलला.

'तुझ्या आई बाबांची भेट केव्हा घालून देणार आहेस ?' दिशानं पुन्हा नेहमीचा निलेशला न आवडणारा विषय काढलाच.

त्यावर काहीही समाधानकारक उत्तर मिळणार नाही याची तिला खात्रीच होती. प्रत्येक वेळी निलेश या प्रश्नाला बगल देत असे. आताही खरं तर त्याचे आईबाबा नागपूरातच होते. त्याच्या दोन मामांचं प्रॉपर्टीच्या संबंधात मोठं भांडणं झालं होतं. आणि दोघेही सख्खे भाऊ एकमेकांच्या जिवावर उठले होते. निलेशची आई त्या भावंडांची एकुलती एक बहीण होती. तिला प्रॉपर्टीतले काही नको होते. फक्त भावांनी गुण्यागोविंदाने रहावे अशी तिची इच्छा होती. दोघांत समेट घडवून आणण्यासाठी ती मुद्दाम मुंबईहून आली होती. दिशाला वाटायचं निलेशनी साधी मैत्रीण म्हणून तरी तिची निदान आईशी तरी भेट घालून द्यावी. पण निलेशला माहिती होते तिला आणखी त्रास होईल. आधीच भावांच्या भांडणाने तिचे डोके कावले होते. त्यात पुन्हा ही नवी मैत्रीण म्हणजे आधीची उजळणी नको.

आईने त्याला इथे येण्यापूर्वी सांगितले होते, 'आता पुन्हा कुणात गुंतू नकोस. तोच खेळ पुन्हा खेळण्याची ताकद नाही आमच्यात. तुझ्या मोठ्या बहिणीचं लग्न ठरू दे. आम्ही तुझ्यासाठी स्वत: आपल्या जाती धर्माची मुलगी बघू. '

वडिलांनीही त्याला हेच वेगळ्या शब्दात सुनावले होते. 'धंद्यावर लक्ष केंद्रित कर. इमारती बांध. धरणं उभार, नद्यांवर पूल टाक. शहरं रस्त्यांनी जोड. पण माणसांपासून स्वत:ला जप. माणसं आतल्या गाठीची असतात. बनेल असतात. मनं मोडायला आयुष्य उद्ध्वस्त करायला त्यांना काही लाज वाटत नाही. स्वत:ला जप.'

आईवडिलांच्या या तंबीनंतरही तो दिशात गुंतला होता. आणि हे त्यांच्यासमोर कबूल करण्याचे धाडस त्याला होत नव्हते. शिवाय त्याला असेही वाटायचे की त्यांना सांगून तरी नेमके काय साध्य होणार ? वर्ष दोन वर्ष काही ते आपल्या लग्नाचा विचार करण्याच्या मन:स्थितीत नाहीत. वेळ येईल तेव्हा एकदम सांगू. तोवर असेच भेटत राहू. एकमेकांवर जमेल तसे प्रेम करू. संबंधाच्या गुंत्याच्या पुन्हा निरगाठी होणार नाहीत याची काळजी घेऊ. दिशाला अर्थातच हे मान्य नव्हते. तिला एक भक्कम आश्वासन हवे होते. त्यांच्यातर्फे, त्यांच्या कुटुंबियांतर्फे ! दिशा कधी कधी या कारणावरून

त्याच्याशी भांडण उकरून काढायची. पण वर्ष दीड वर्षानंतरही फार काही बदलले नव्हते.

तिला कधी कधी वाटायचे आधीचेच दिवस बरे होते. नुसते हातात हात घेऊन तळ्याच्या पाळीवर बसण्याचे. चांदण्या रात्री जेवणानंतर मोकळ्या रस्त्यांवरून फिरण्याचे. बेधुंद मोटरसायकलवर त्याच्या मागे बसून गावाच्या बाहेर भटकंतीला जाण्याचे. त्यात मन मोकळे होते. कुठल्या निरगाठी नव्हत्या. एकमेकांकडून कुठल्या अपेक्षा नव्हत्या. अशाच एका गावाबाहेरच्या रेसॉर्टमध्ये दोघांना दिशाच्या मैत्रिणीने बघितले. तिने त्याचा काढायचा तोच अर्थ काढला. दोघांचे अफेअर असल्याचा. मग मात्र दिशाचे धाबे दणाणले.

'आपल्या संबंधाचा नेमका अर्थ काय ? हे नाते मैत्रीचे आहे, की त्यापलिकडे आपल्यात काही आहे ?' दिशाने त्याच्या मोबाईलवर एस. एम. एस. केला.

रात्रभराच्या विचारानंतर त्याचा उलट निरोप आला, आपल्या नात्याचा नक्की आवाका मलाही अद्याप कळलेला नाही. कारण मी त्यावर कधी फारसा विचार केला नव्हता. पण आता असे वाटते की मला वाटले तितकें उथळ आपले नाते नक्कीच नाही. ते खोल विहिरीसाखे आहे. असे वाटते त्यातले प्रेमाचे झरे कधी आटणार नाहीत.'

दिशा हरखून गेली होती. पण नंतर सगळ्याच संबंधात घडते तसे वेगाने काहीतरी बदलले होते. नंतरच्या काळात तो तिला अनेकदा गृहित धरू लागला. तिच्याशी दुराग्रहाने वागू लागला. तिच्या आवडीनिवडी, तिचे छोटे छोटे आनंद, याविषयी जराशी अनास्था दाखवू लागला. मी, माझे शहर, आणि माझ्या आवडीनिवडी यातच तो रमला. जणू तिचं भावविश्व त्याच्या खिजगणतीतही नव्हते. तिला आता जाणवले तो दोन पातळीवर हट्टी होता. एक भावनिक पातळीवर आणि व्यावहारिक पातळीवर तिचे मन जरासे खंतावले.

पण आता उशीर झाला होता.

'सगळ्याच संबंधात नेहमी असेच होत असेल का ? कुठल्यातरी अपूर्णतेच्या जाणिवेतून आपण सतत एक शोध घेत असतो. तो शोध थांबल्यासारखा वाटत असतानाच एक नवीन पोकळी आपल्या भोवती दाटून येते. मग घालमेल होते. तडफड होते. आधीची अपूर्णता निदान आपल्यापुरती तरी पूर्ण असते. पण ही दोघांच्या अपूर्णतेतून जन्माला आलेली अधिक अपूर्णता मन कमालीचे निराश करते. त्यातून सुटकाही होत नाही. आणि त्यातून मुक्त होण्याचा प्रयत्न केलाच तर मन अधिकच खोल गर्तेत जाते.' असे तिला वाटले. दिशाचे आज काहीतरी बिनसले आहे हे निलेशला कळले होते. पण नेमके निदान त्याला होत नव्हते. खरं तर तो इतरांच्या मनांचा खूप सखोल अभ्यास करायचा. माणसे वेगवगळ्या वेळी कशी आणि का वागतात, यावर नेहमीच तो अभ्यासपूर्ण बोलायचा. पण आजच्या दिशाच्या मूडचा थांग त्याला लागत नव्हता.

'किसी पेशंटके वजह से डिस्टर्ब हो?' त्याने तर्क करून सहज विचारले.

दिशा त्यावर काहीच बोलली नाही. मग त्याने ठेवणीतले भाषण ठोकलेच.

'पेशंट कधीच आपला नसतो. त्याच्या व्याधी फक्त आपल्या. त्याच्या दुखण्यात गुंतावं हवं तर. पण पेशंटचे प्रॉब्लेम्स, त्याची दुखणी कधी सोबत बाळगू नयेत. इट इज अनएथिकल !'

'मला ते जमले असते तर तू माझ्या आयुष्यात कधीच आला नसतास.' दिशानेही मग ठेवणीतले उत्तर दिले.

मग दोघे उठलेच. आता एक ताण दोघांत बिल्ड अप होतो आहे, याची दोघांनाही जाणीव झाली. दोघेही मग कॅफेच्या पायऱ्या नाराजीतच उतरले. आणि एकमेकांचा निरोप घेऊन आपापल्या घरांच्या दिशेने निघाले. दिशाला वाटलेही, आपले मार्ग इतके भिन्न, इतके विरुद्ध का?

पाऊस वेड्यासारखा सुरूच होता. आणि रेनकोटच्या आत दिशा भिजतच होती. एरवी असे

भिजणे तिला आवडायचे. पण आज मात्र तिला पावसाचाही मनापासून राग येत होता. आज तिचे काहीतरी खोलवर बिनसले होते. आज मेहता हॉस्पिटलमधल्या पेशंटस्नीही तिला बरेच छळले होते. आणि सगळ्यांत आघाडीवर अर्थातच आमदार निळकंठ जाधव होता. सत्तरी ओलांडलेला माजी आमदार जाधव तिच्याशी खूपच लगट करायचा. तो होता रुबाबदार. पण त्याला आपल्या दिसण्याचे, आपल्या श्रीमंतीचे, किळसवाणे कौतुक होते. कधी कधी दिशाला त्याची आत्मप्रौढी ऐकून शिसारी यायची. वर तो तिच्याशी राहणीमानावर सतत काहीतरी बोलत असायचा.

'तू मॅचिंग का केलं नाहीस? फॅशन्ड आहे..
आज केस का विस्कटलेत तुझे ?
माझं राहणं बघ.

माझ्या बायकोला या वयातही माझ्या रुबाबदारपणामुळे असुरक्षित वाटतं.. '

जाधवच्या या बोलण्याचा तिला भारी राग यायचा. आणि तो मुद्दामच मोठ्यांदा इतर पेशंटस्ना ऐकू जाईल असं बोलायचा. कधी कधी तिला अगदी लाज लाज वाटायची. अनेकदा तिनं मेहता सरांकडे तक्रारही केली होती. पण मेहता सर हसून उडवून लावायचे. राजकारणात अजूनही त्याचं वजन होतं. तो आजही अनेक संस्थांचा अध्यक्ष होता. त्यामुळे मेहता सरही त्याला जास्तीचा आदर दाखवीत. बरं तो मेहता सरांविषयीही गलिच्छ बोलायचा. मेहताचे केतकीशी अनैतिक संबंध आहेत. केतकीच्या लहान दोन मुली मेहतापासून झालेल्या आहेत. असले काहीबाही. तो वाह्यात बोलायचा. आणि मेहता सरांचा एकेरी उल्लेख करायचा. दिशाला हे अजिबात आवडत नसे. अर्थात हा विषय हॉस्पिटलच्या स्टाफमध्ये सतत हलक्या आवाजात चर्चिला जायचाच.

'मेहता सरांसारख्या हँडसम माणसानं केतकीत एवढं काय पाहिलं?' याचं तिला नेहमीच आश्चर्य वाटायचं.

मेहता सरांची बायको गायनॉकॉलॉजिस्ट होती. दिसायला खूप सुंदर होती. त्यांना दोन गोजिरवाणी मुलं होती. त्यानंतर सरांचं कुणा डेंटिस्टशी अफेअर झालं. ते खूप गाजलं अगदी स्थनिक वर्तमानपत्रातूनही त्यावर काही बाही छापून आलं बायकोनं मग घटस्फोट घेतला. आणि ती दूर आदिवासी भागात काम करायला निघून गेली. मेहता सर तिला अडवू शकले नाहीत. खूप एकटे पडले. त्यांचं सर्जरीतलं लक्ष उडालं त्याचा फायदा त्याच्या विरोधकांनी उचलला. आणि केतकीनंही. तिनं त्यांना आपल्या मोहपाशात जकडलं. तिच्या नवऱ्याचीही तिला साथ होती. पेशाने नर्स असलेल्या केतकीला मेहता हॉस्पिटलमध्ये वरवर का होईना मालकिणीचा दर्जा मिळाला. केतकी त्याचा भरपूर गैरवापर करायची. इतर नर्सेस, वॉर्डबॉईज यांच्यावर ती आपला रूबाब दाखवायची. त्यांचे सुट्ट्यांचे पैसे कापायची. कुणाही विषयी सरांच्या मनांत विष कालवायची. आणि सर आंधळ्यासारखं हे सगळं खपवून घ्यायचे याचा दिशाला राग यायचा. फक्त केतकीनं दिशाच्या कामात कधी ढवळाढवळ केली नाही. नाहीतर दोघींत जुंपलीच असती. दिशाचे पेशंटस्, त्यांचे पैसे यावर केतकीचा काहीच अधिकार चालत नसे. केतकीला म्हणूनच दिशाचा तिच्या युनिटवरचा कंट्रोल सहन होत नसे. तिनं दिशा आणि निलेशविषयी सरांना सांगून बघितले. पण कां कोण जाणे सरांनी दुर्लक्ष केले.

मध्ये एकदोनदा दिशाला वाटलेही, सर आपल्याला काही बोलतील. तिनं राजीनामा लिहूनही आणला होता. पण सर काहीच म्हणाले नाहीत.

कदाचित व्यक्तिगत संबंधामध्ये डोकावणे त्यांना आवडत नसावे. किंवा या विषयावर कुणाला बोलण्याची त्यांची हिम्मत होत नसावी असे दिशाला वाटले. पण त्यामुळेच गेल्या कित्येक दिवसांपासून ठरवूनही मेहता सरांना काही बोलणे दिशाला जमत नव्हते.

क्लिनिक मधली दुसरी छळणारी पेशंट म्हणजे कवयित्री आयेशा. ती खरं तर एका महाविद्यालयात

भाषा विषय शिकवित असे. तिची काही जड पुस्तकं प्रकाशितही झाली होती. पण दिशाला तिने मुद्दाम 'अश्क' हा तिचा कविता संग्रह वाचायला दिला होता. तिला सतत असं वाटायचं की मुस्लीम असल्यामुळे आपण या देशांत परके आहोत. या मातीत आपण खरे रूजलोच नाही. इथली नाती, कुटुंबव्यवस्था, इथल्या माणसांची मनं, आपल्याला नीट उलगडलीच नाहीत. तिला भारतीय संस्कृती विषयी कमाल आकर्षण होते. पण भारतीय संस्कृतीच्या प्रवाहात आपण सर्वस्वी सामावलो नाही ही सल तिच्या अनेक कवितांतून तिने थेट मांडली होती. तिच्या अवती भवती भारतात राहून पाकिस्तानविषयी अपार प्रेम असलेली माणसं तिनं बघितली होती. पण तिला असे भाबडे प्रेम पाकिस्तानविषयी वाटत नव्हते. पाकिस्तानविषयी तिला जराशी अनास्थाच होती. आणि तिच्या भारतप्रेमाला तिच्या अवती भवतीच्या भारतीय माणसाकडून कधी थेट प्रतिसाद मिळाला नव्हता. 'अश्क' हा तिच्या भारतातील उपरेपणाच्या दुःखाचा हुंकारच होता. दिशाला तिच्या कविता फारशा आवडल्या नव्हत्या. कारण त्यात कवितेची नजाकत नव्हती. तिची काव्यभाषाही प्राध्यापकी होती. सगळे जग जणू काय आपले विद्यार्थी आहे या थाटात तिनं या कविता लिहिल्या होत्या. दिशाला ती या कवितांविषयी भरभरून सांगायची. आपल्या शिकविण्याच्या हातोटीविषयी सांगायची. कधी नवऱ्याच्या छळाविषयी सांगायची सगळ्याच ठिकाणी ती बिच्चारी होती. दुःखी होती. निराश होती. दिशाला कधी कधी याचा उबग यायचा! तिला वाटायचे हिचा नवरा हिला छळतो म्हणून ही बया मला छळते की काय !

आजही आयेशाने दिशाला मनसोक्त पिळले होते. काही कविता म्हणून दाखवल्या होत्या. नवऱ्याची तीच गाऱ्हाणी पुन्हा पुन्हा सांगितली होती.

इतक्या पेशंटकडून ऐकून दिशाला हे नक्की माहिती झाले होते, की लग्नानंतर प्रत्येकच स्त्री संबंधाच्या बाबतीत असमाधानीच असते. तिला वाटले आपल्याला तर हे असमाधान आत्तापासूनच डाचायला लागले आहे. पावसाने आता चांगलेच रौद्र रूप धारण केले होते. आणि आता गाडी चालवणे तिला अवघड होत होते. तिने स्कूटरची गती कमी केली. पावसाचे टपोरे थेंब तरीही तिच्या पापण्यांवर वेगाने आदळत होतेच. रस्त्यावर आता पावसाच्या पाण्यात दिव्यांचे प्रतिबिंब पडून रस्ते कमालीचे रंगीबेरंगी झाले होते ! दिशा घरी पोहचली तरी पाऊस वेड लागल्यासारखा कोसळतंच होता. आत आल्यावर तिनं दारं, खिडक्या आतून घट्ट बंद केल्यात. ओले कपडे बदलताना ती मनोमन पावसावर चिडत होती. काहीही खायला करण्याची तिची इच्छा नव्हती. आज सकाळचेही काही उरले नव्हते. स्वयंपाकीण काकूंनी आज फारच मोजका स्वयंपाक केला होता. त्यांचीही चूक नव्हती. घरात होती नव्हती तेवढी कणीक आणि भाजी त्यांनी वापरली होती. दिशाला काकूंचाही पावसासारखाच राग आला.

तिने रागातच खसाखसा ओले अंग पुसले. भिजलेले केस पुसले. आणि टॉवेल डोक्याला बांधून कोरडे कपडे चढवले!

तितक्यात रोजच्यासारखाच प्राचीचा मुंबईहून फोन खणाणलाच.

'काय एवढं रोज बोलायलाच हवं असतं तुला ? नाही एक दिवस फोन केलास तर काय अगदी अडणार आहे का माझं?' दिशा एकदम बहिणीवर चिडलीच!

' काय झालं? भांडण बिंडण झालंय का निलेशशी?' प्राची मजेत हसत बोलली.

दिशाला तिच्या हसण्याचा भयंकर राग आला. हसतांना प्राची गोड दिसते, आणि तिच्या गालावर खळी पडते याचंही तिला या क्षणी वैषम्य वाटत राहिलं. प्राचीचा बॉयफ्रेंड सजल तिला फुलासारखी जपतो. सतत तिच्या मागे मागे करतो, त्यामुळे ही शेफारली आहे, असं दिशाचं ठामच मत होतं.

आणि प्राचीलाही सजलच कोण कौतुक होतं ! तिला बॉयफ्रेंड असावा तर असाच ! दिशाचा निलेश

प्राचीला अजिबात आवडत नव्हता. प्राचीला वाटायचं तिनं जसा तिचा नग अगदी ठोकून वाजवून घेतला. तसाच दिशानंही घ्यायला हवा होता. दोन वर्ष तर प्राचीनं सजलला माकडासारखा झुलवत ठेवलं होतं. मग त्यानं खूप प्रेमाच्या आणाभाका घेतल्यावर नाईलाज झाल्यासारखा होकार दिला होता. सजल प्राचीच्या मानानं दिसायला डावाच होता. पण त्याचं तिच्यावर निरतिशय प्रेम होतं. आणि या प्रेमामुळेच त्यानं तिला जिंकलं होतं. प्राचीचं आधीही एक अफेअर होतं. खरं तर ते तुटेपर्यंत तिनं सजलला अजिबात जवळ फिरकू दिलं नव्हतं.

प्राची रोजच्यासारखीच फोनवर बोलत राहिली. सकाळी केव्हा उठली. दिवसभर काय काय केलं. सजलनी आज तिच्यासाठी काय नवं केलं. ऑफीसमध्ये काय गमती जमती झाल्यात. सगळं !!! तिच्या अवती भवतीची मुंबई तिनं दिशाच्या डोळ्यासमोर उभी केली!! रोजच्यासारखीच !!!

पण दिशाला आज का कुणास ठाऊक सतत राग राग येत होता.

''यांच्यात काहीच का ताण नाहीत? कधीच यांना भांडायचं नसतं कां एकमेकांशी'' तिला वाटत राहिले.

मग दिशानं काही न खाताच निजण्याचा निर्णय घेतला. आणि ती कॉटवर आडवी झाली. सकाळपासूनच्या दगदगीमुळे तिचे पाय खूप दुखत होते. तिने डोक्याचा टॉवेल सोडून करकचून पायांना बांधला. आणि पाय उंच लोडावर ठेवले. तिला किंचित बरे वाटले. खोलीत रोजच्या सारखा गच्च अंधार करूनही तिला झोप लागत नव्हती. तिचे डोकेही हलके हलके दुखायला लागले होते. सकाळी होम व्हिजीटस् करण्याची, सेंटरला जाण्याची तिची अजिबात इच्छा नव्हती.

इतक्यात आईचा फोन वाजला. आईची विचारपूस सुरू होती. प्राचीनी लगेच फोन करून आईला दिशाचे काहीतरी बिनसल्याचे कळवले होते. त्यामुळे आई अगदी खोदून खोदून विचारत होती. दिशानी आधी तुटक उत्तरं दिलीत. मग एकदम विषय बदलला. तिनं एकदम बाबांचा विषय काढला. सहा महिन्यांपूर्वी तिच्या बाबांना पॅरेलिसिसचा अटॅक आला होता. पहिले काही दिवस त्यांनी औषधे नीट घेतली होती. तंबाखू खाणे सोडले होते. सांगितलेले व्यायामही ते नीट न चुकता करत होते. पण गेल्या काही दिवसांपासून ते पुन्हा मूळ पदावर आले होते. दिशाने यापूर्वीही आईला याविषयी टोकले होते. आज तिने पुन्हा एकदा आईलाच फैलावर घेतले. मग आईनीही विषय बदलला. घराच्या लँडलाईनचं बिल साडे तीन हजार रुपये आल्याचं आईनं तिला सांगितलं. दिशाला काही कळेना. तिचा लहान भाऊ निरंजन आणि छोटी बहीण रूपा यांनीच कॉल केले असतील असं आईचं ठाम मत होतं. पण ते कुणाला इतके फोन करत असतील हा प्रश्न तिला सतावीत राहिला. कदाचित निरंजनला एखादी मैत्रीण असेल, आणि रूपालाही कुणी बॉयफ्रेंड असेल असे तिला वाटत राहिले. पण ती आईला काही बोलली नाही. आईचा स्वभाव तिला पुरता ठाऊक होता. तिला नुसता असा संशय जरी आला तरी ती दोघांनाही फाडून खाईल, हे तिला माहिती होते. तिने अजून निलेशविषयी सुद्धा आईला नीट सांगितले नव्हते. खरे तर तो आईला दोन चारदा भेटला होता. आणि दोघांत फक्त मैत्रीपलिकडचे काही आहे. याची तिच्या आईला कल्पना आली होती. पण ती काही बोलली नव्हती. घरच्यांना फक्त प्राची आणि सजलच्या अफेअर ची पूर्ण कल्पना होती. कारण प्राचीला एका सधन कुटुंबातील देखण्या मुलानं मागणी घातली होती. आणि ती तिने धुडकावून लावली होती. सगळ्यांनी तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. ज्या मामांच्या मध्यस्तीने ते स्थळ आलेल होते, तेही फोनवर तिच्याशी बोलले होते. पण तिनं धोरणीपणाने आईबाबांशी बोला असे सांगून त्यांना कटवले होते. दिशाला नेहमीच वाटे, हिला सगळे बरे जमते!! आई, बाबा, प्राची, निरंजन, रूपा सगळेच आज तिला आलटून पालटून आठवत राहिले.

अनुक्रमणिका

तिला अकस्मात वाटले या सगळ्याशी आपले काय नाते आहे ? निलेशशी तरी आपले काय आणि किती खोलवर नाते आहे? तिला काहीच कळेना!! आताच आपण सत्तावीस वर्षाच्या झालो. अजून दोन वर्ष लहान बहिणीचे लग्न होईपर्यंत निलेश आपल्या आईवडिलांशी आपली भेटही घालून देणार नाही. दरम्यानच्या काळात आपण कुठल्या आश्वासनावर त्याच्यावर विसंबून राहयचे? तो आपल्याला सोडून जाणार नाही कशावरून?

या विचाराबरोबर दिशाच्या छातीत एक हलकी कळ आली!! तिला सारेच कमालीचे अशाश्वत आणि असुरक्षित वाटू लागले. आई बाबांच्या संसारातला विसंवाद तिनं बघितला होता. बाबांनी आईला नेहमीच कस्पटासमान वागणूक दिली होती. निलेशही तिला नेहमीच तुच्छतेची वागणूक देत होता. कितीदा तिचा अहंकार त्याच्यामुळे दुखावला होता. पण तरी त्याला सोडणे तिला जमत नव्हते. कारण त्याच्याशिवाय दुसरा कुठलाच पर्याय तिला उपलब्ध नव्हता.

निलेश मुंबईचा असल्यानं त्याच्यात आधीच जरासा अहंकार होता. त्यात त्यानं तिच्यापेक्षा अधिक जग बघितले होते. दिशाची अनेक विषयावरची मते त्याला बावळटपणाची, बालीशपणाची वाटत. आणि हे वाटणे त्याने कधी दिशापासून लपवलेही नव्हते. तिला कधी कधी वाटे त्यानेही आपल्याला सजल प्राचीला देतो तसा भाव द्यावा!! त्याने आपल्या मागे मागे करावे!! पण निलेश कदाचित पहिल्या प्रकरणानंतर त्या बाबतीत कोरडा झाला होता. तिला हवासा वाटावा असा अनुनय निलेशनी तिचा कधीच केला नाही.

तिला कधी कधी वाटे याची श्रद्धाच नाही कशावर. हा स्वत:ला सोडून कुणाला काही समजतच नाही. पण मुंबईला त्याचे एक श्रद्धास्थान होते. त्याचे सारंग सर!! सारंग आणि त्याच्यात वयाचे फार अंतर नव्हते. पण त्याच्या प्रत्येक निर्णयाला सारंग सरांचे अप्रूव्हल त्याला हवे असायचे!! दिशालाही त्याने सारंग सरांना भेटायला भाग पाडले होते. कदाचित त्यांनी अप्रूव्ह केल्यावरच त्याने दिशाला मनापासून स्वीकारले होते.

आज तिला सारंग सरांचाही राग येत होता!!!

बाहेर पाऊस सुरूच होता. तिला वाटले हा पाऊस असाच कल्पांतापर्यंत कोसळत राहणार आणि आपण न भिजता आतपर्यंत असेच कोरडेच राहणार!! निलेश कधीच पुढाकार घेणार नाही. आणि आपले आईबाबाही आपल्या लग्नाचा प्रयत्न करणार नाहीत. तिला सगळेच कमालीचे विसंगत आणि अर्थहीन वाटू लागले.

आई-बाबांचा संसार!!

तिचे आणि निलेशचे न उलगडणारे नाते!!

तिच्या सेंटरवरची अपंग मुले!!!

त्यांचे शक्तीविहीन पाय!!

त्यांच्या डगमगणाऱ्या माना!!!

त्याच्या आईवडिलांची कधीच पूर्ण न होऊ शकणारी स्वप्ने !!!

मेहता सरांचा केतकीशी असलेला अनुबंध!!

तिच्या फिजिओथेरपी युनिटमधले दु:ख भोगणारे पेशंटस् !!

या सगळ्यात ती कोठे होती? या सगळ्यांशी तिचा काय संबंध होता? इथे येणारा प्रत्येक जीव काय फक्त निराश होण्यासाठीच जन्माला येतो? कुणालाच कधीच इथे निर्भेळ सुख मिळणारच नाही की काय? या सगळ्या अर्थहीन तुकड्यांचा तिला मनस्वी कंटाळा आला !!!

या निराश मूडमध्येच कधीतरी तिचा डोळा लागला !!

तिच्या स्वप्नांतही पाऊस पिसाटासारखा कोसळतच होता. पण पावसाच्या पलिकडे दूर एक तळे तिला दिसत होते. त्यात हळूवार उमलणारे एक कमळ तिला खुणावत होते. दिवसभराच्या सगळ्या निराशेपलिकडे नेणारा तो अनुभव होता. असे काही तरी आपल्या आत कधी उमलेल का? असे तिला वाटले. तिने झोपेतच आपला हात लांब केला. कमळाच्या पाकळ्यांच्या स्पर्शानं ती आतपर्यंत

सुखावली!! तिच्या चेहऱ्यावर निर्व्याज आनंदाचे हसू उमलले!! किती दिवसांनी ती अशी हसत होती. जगण्याच्या धामधुमीत हे लहानगे हसू कुणीतरी तिच्या चेहऱ्यावरून पुसून टाकले होते!! की आपणच हे आपल्या हातानं पुसून टाकले आहे? आपण, आपल्या भोवतीच्या प्रत्येकाने, हे निर्व्याज हसणे असेच कुठेतरी हरवून टाकले आहे ही जाणीव तिला झाली. स्वप्नातला पाऊस आता तिच्या अंगावर, केसांवर, मनावर अविरत कोसळत होता. ती पुलकित झाली होती. एका अवर्णनीय आनंदात तल्लीन झाली होती. तिला मनसोक्त नाचावेसे वाटत होते. जणू सगळी सृष्टी एका निरामय आनंदात डोलत होती... आणि तिच्या आत तेच निसर्गसंगीत अनाहतपणे निनादत होते!!

□□□

प्रकाशकांसाठी सूचना

१. लेखकांनी आपले साहित्य कागदाच्या एका बाजूने लिहून वा मुद्रित करून पाठवावे.

२. लेखनाच्या डाव्या बाजूस आवर्जून समास सोडावा.

३. लेखन सुवाच्य हस्ताक्षरात आणि शुद्धलेखनाचे अधिकाधिक नियम पाळणारे असावे.

४. लेखकाने आपल्या लेखनाची प्रत स्वतःजवळ ठेवावी. नापसंत लेखन परत पाठविणे शक्य होणार नाही.

५. लेखनाच्या स्वीकृतीसंबंधीची निर्णय सर्वसाधारणपणे दोन महिन्यात कळविला जाईल.

६. लेखन अनुवादित वा रूपांतरीत असल्यास मूळ लेखकाची व प्रकाशकाची संमती लेखी स्वरूपात जोडावी.

७. निर्णय कळविण्यासाठी स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टकार्ड लेखनासोबत पाठवावे.

अनुक्रमणिका

।। दोन कविता।। प्रमोद गारोडे

१. किती दिवस...

किती दिवस...
नाकारणार तुम्ही
माझं अस्तित्त्व
एक दिवस हे नाकारणंच
तुम्हाला अस्तित्त्वहीन केल्याशिवाय राहणार नाही.
तुमच्या नाकारण्यानेच
माझं मोठेपण सिद्ध होईल.
तेव्हा...
तुम्ही कुजाल
एखाद्या डबक्यातील साचलेल्या पाण्यासारखे!
मग...
तुमच्या बोलण्याकडे, हसण्याकडे, वागण्याकडे
सारेच पाहतील संशयाच्या नजरेने.
तेव्हा...
तुमच्या अस्तित्त्वाचा मृत्यू
तुम्हालाच पाहावा लागेल
उघड्या डोळ्याने.
अशावेळी रडताही येणार नाही अन् सांगताही!
मग
भटकत राहाल विमनस्कावस्थेत
विचारांच्या निबिड वनात
कपाळावर चिघडणारी जखम घेऊन
अश्वत्थाम्यासारखं !
❑❑❑

२. जंगलं संपली तर...

जंगलं संपली तर....
दिसणार नाही सावली,
शोधणाऱ्या मुलाची
हरवलेली माऊली.

जंगलं संपली तर....
मिळणार नाही पाणी,
भटकणाऱ्या माणसांची
वांझोटी कहाणी.

जंगलं संपली तर....
दिसणार नाही प्राणी,
पुस्तकातील चित्रांमध्ये
नवी पिढी समाधानी.

जंगलं संपली तर....
मिळणार नाही शुद्ध वारा,
आटलेल्या नदीचा
जसा आसुसला किनारा.

जंगलं संपली तर....
वाढत जाईल ऊन,
प्रत्येकाच्या जीवनाची
सुरू भैरवीची धून.
❑❑❑

अनुक्रमणिका

।। तीन कविता।। प्रशांत असनारे

१. विठोबा...

गाभाऱ्यात
मूर्तीजवळ प्रचंड गर्दी आहे
भक्तांची.

गाभाऱ्यात
गुळखोबऱ्याजवळही प्रचंड झुंबड आहे
मुंग्यांची

क्षणाक्षणाला
भक्तांची घेमार गर्दी वाढते आहे
मुंग्याचीही झुंबड कमी झालेली नाही.

भक्तांचं मुळीच लक्ष नाही गुळखोबऱ्याकडे
मुंग्याचंही कुठे लक्ष आहे देवाकडे?

पण एवढं मात्र नक्की
की भक्तांनी कितीही केली दाटी
किंवा रेटारेटी
तरी गाभाऱ्यातला तो देव
सूतभरही हालणार नाहीय्
पण ह्याच गाभाऱ्यात
आता थोड्याच वेळात
अलगद थरथरणार आहे
खोबऱ्याची पांढरीशुभ्र वीट
अन् मुंग्याच्या तालावर बेधुंद नाचणार आहे
गूळ नावाचा पिवळाधम्म विठोबा !
□□□

२. राजपुत्र

तुझ्या कोरड्या अन् राकट खांद्यावर
जादूचा पक्षी बसला
अन् तू
राजस राजपुत्र झालास
कणाकणानं...!

आता तू जपून ठेव
तुझ्या डोक्यावर आलेला लखलखता मुकुट
हातातलं चिंब ओलं मोरपीस
अन् पायातल्या टोकदार पण नक्षीदार वहाणा!

देऊ नकोस शरीराला
असा कोणताही मस्तवाल हेलकावा
ज्यानं तळहातावरचा पक्षी उडून जाईल
कारण
तो जर उडून गेला
तर हा बेढब खांदा घेऊन
तू काय करशील?

तात्पर्य
लक्षात ठेव
तो पक्षी आहे,
म्हणून तू राजपुत्र आहेस!
□□□

३. बदल

अचानक
माझ्या हातापायाची बोथट नखं
फूटभर वाढतात,
कुबड्या चेटकीणीसारखी.

कधी कधी माझे हे कनवाळू डोळे
बुबुळासकट बाहेर येतात
वीतभर.

अनुक्रमणिका

कधी कधी माझी वत्सल जीभ
वळवळते,
लवलवते,
अगदी मुजोर पालीसारखी.

मला कळत नाही
माझ्यात अचानक होणाऱ्या
ह्या राक्षसी बदलाचं ठोस कारण !

लहानपणी
आईची ओली नजर चुकवून
मी एक झुरळ गिळलं होतं,
ते तर आता माझ्यात मोठं झालं नसेल ?
❑❑❑

।। दोन कविता।। विश्राम प्रामाणिक

१. पाणी आणि ओलाव्यासारखे

मनात साचलेलं
लिहिता लिहिता
उडून जाईन मी
शब्दांतून
तेव्हा अलगद
उतरशील तू
कागदावर
अभिव्यक्त करत
स्वत:लाच.
हळूहळू संपतील सारे शब्द
होऊन जाऊत
मी-तू आणि तू-मी
पाणी आणि ओलाव्यासारखे.
❑❑❑

२. मी रिताच

शब्दांना विसावाच नाही
बागडतात फुलपाखरांसारखे.
येतात कधीमधी
ओंजळीत
पण निसटतात चिमटीतून
कागदावरती.
बोटांना मिळालेला रंग
नसतो माझा.
मी रिताच
चिमटीसारखा.
❑❑❑

कांही हायकू सुचित्रा कातरकर

१.
पिवळेपणीही पानं
दिसताहेत देखणी
हिरवेपण जपलंय त्यांनी
२.
जंगल नि:शब्द
ना पाखरांची किलबिल
गाणेच संपले गळ्यातील
३.
आजचा माणूस मुका
सारीकडे एकच एक
राखाडी रंग मळका
❑❑❑

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

।। कार्यवृत्त ।।

एप्रिल-मे-जून २००८

नागपूर ४ एप्रिल ज्येष्ठ लेखक प्राचार्य राम डोके, आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. गोपाळराव वाघ्रळकर, ज्येष्ठ रंगकर्मी सुमंत गडेकर यांना वि. सा. संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

३० एप्रिल: विदर्भ साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. भाऊ मांडवकर आणि लोकसाहित्याच्या संशोधक डॉ. सरोजिनी बाब्बर यांच्या निधनाबद्दल आयोजित शोकसभेत डॉ. लता लांजेवार, डॉ. संध्या पवार आणि प्रा. द. सा. बोरकर यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या.

५ मे ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या निर्मला देशपांडे यांच्या निधनानिमित्त वि. सा. संघातर्फे आयोजित सभेत सर्वश्री मामासाहेब घुमरे, मा. म. गडकरी, वसू आणि सौ. सुशीला देवरस यांनी श्रद्धांजली वाहिली.

११ मे सुप्रसिद्ध लेखिका शकुंतला खोत यांच्या निधनानंतर आयोजित सभेत वि. सा. संघाच्या सरचिटणीस शोभा उबगडे, नलूताई जोशी, सुनंदा नाझर यांनी शोक संवेदना व्यक्त केल्या.

२३ मे : ख्यातनाम नाटककार विजय तेंडुलकर यांना डॉ. वि. स. जोग, वामन तेलंग, पराग घोंगे, हरीश इथापे यांनी शब्दांजली वाहिली. अध्यक्षस्थानी श्री. गिरीश गांधी होते.

१ मे प्रसिद्ध नाटककार स्व. नाना जोग यांच्या वि. सा. संघाच्या कार्यालयातील अर्धपुतळ्यास अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर यांनी माल्यार्पण करून आदरांजली वाहिली. कार्यकारिणी सदस्य याप्रसंगी उपस्थित होते.

६ एप्रिल प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते व विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाचे उपाध्यक्ष श्री. उमेश चौबे यांच्या वयाच्या अमृत महोत्सवानिमित्त वि. सा. संघाच्या वतीने प्रा. राम शेवाळकर, मनोहर म्हैसाळकर आणि श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी प्रत्यक्ष भेटून त्यांचे अभीष्टचिंतन केले.

३ एप्रिल महाराष्ट्र हिंदी भाषा अकादमीचे कार्याध्यक्ष आणि 'ब्लिट्झ' या साप्ताहिकाचे माजी संपादक नंदकिशोर नौटियाल यांनी विदर्भ संघास भेट देऊन संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार प्रभाकर कोलते यांनी विदर्भ साहित्य संघास भेट देऊन सांस्कृतिक संकुलातील कलादालन, रंगमंदिर, ग्रंथालय या विभागाविषयी आस्थेने चौकशी केली.

१ मे वि. सा. संघ आणि अंकुर रंगभूमी यांच्या संयुक्त विद्यमाने व्यक्तिमत्व विकास आणि बालनाट्य शिबिर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन वि. सा. संघाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केले.

१ मे : वि.सा. संघातर्फे तुकडोजी महाराजांच्या जन्मशताब्दीनिमित्त अभ्यासक डॉ. बाळ पदवाड यांचे 'तुकडोजी महाराजांची ग्रामराज्य विषयक कल्पना' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.


❑❑❑

प्रकाशने

विदर्भ साहित्य संघ

- मराठी वर्णोच्चार विकास : डॉ. द. ह. अग्निहोत्री........ १६.०० रु.
- लोक साहित्य संपदा संपादक : ना. रा. शेंडे........ ६.०० रु.
- आणखी गडकरी : डॉ. मधुकर आष्टीकर........ १०.०० रु.
- संशोधन लेख
- निबंध परिमल
- केशवसुत वाङ्मय सूची सौ. उज्ज्वला आयाचित........ १.०० रु.
- गडकऱ्यांची नाट्यशैली : प्रा. रु. पां. पाजणकर........ ८ आणे
- सतारीचे नव्हे, एकतारीचे बोल श्री. द. वि. तेंडुलकर उर्फ प्रफुलदत्त........ ८ आणे
- गडकऱ्यांची नाट्यप्रकृती व नाट्यसृष्टी श्री. वसंत वरखेडकर........ ६० पैसे
- तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ : डॉ. र. श. केळकर........ ४.०० रु.
- 'प्रातिभ' : प्रातिनिधिक लघुकथा संग्रह (१९८०) संकलन : प्रा. ज. रा. फणसाळकर........ २०.०० रु.
- समग्र बजाबा संपादन / संकलन - द. भा. प्रधान........ २०.०० रु.
- हिंदी मराठी भाषा प्रवेशिका श्रीमती मालतीबाई श्रीखंडे........ ४.०० रु.
- ज. के. उपाध्ये यांची कविता (१८८३-१९१३) : संपादन : डॉ. आशा सावदेकर........ ३०.०० रु.
- दक्षिणेतील दोन आचार्य : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी........ ५.०० रु.
- मराठी गद्य : प्रा. श्री. गो. काशीकर........ ३.०० रु.
- कविता विदर्भाची : संपादन : डॉ. सौ. आशा सावदेकर........ ५०.०० रु.
- छंदशास्त्र एक अध्ययन : कुंदर दिवाण........ १०.०० रु.
- वसंत वैभव (कै. व. कृ. वऱ्हाडपांडे) संपादन : डॉ. सौ. कुंदा केळापुरे / डॉ. मदन कुळकर्णी...... ८०.०० रु.
- धन्यतेची थाप (निवडक प्रस्तावना) : डॉ. वि. भि. कोलते........ १००.०० रु.
- वक्ता दशसहस्रेषु : (प्रा. राम शेवाळकर यांची भाषणे) - संपादक : डॉ. वि. स. जोग........ १२५.०० रु.
- विदर्भ साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे : खंड १ : संपादक : सा. भू. तु. ना. काटकर........ ७५.०० रु.
- विदर्भ साहित्य संमेलने अध्यक्षीय भाषणे : खंड २ : संपादक डॉ. श्रीपाद मालचंद्र जोशी........ २५०.०० रु.
- विविध प्रवाही साहित्य संमेलनांची अध्यक्षीय भाषणे : संपादक : डॉ. श्रीपाद मालचंद्र जोशी..... २५०.०० रु.
- युगवाणी साहित्य सूची : संपादक : केशव जोशी........ ७०.०० रु.
- युगवाणी साहित्य सूची (पुरवणी) : संपादक : केशव जोशी........ ५०.०० रु.
- वैदर्भीय मराठी प्रबंध सूची (१९३९-९८) संपादक : डॉ. व. वि. कुलकर्णी........ १००.०० रु.
- विदर्भ साहित्य संघ - अमृत महोत्सवी स्मरणिका (१९९९) संपादन : वामन तेलंग........ २००.०० रु.
- सांजदिव्याचे हंबर - शिवा राऊत (निवडक कविता)........ ६०.०० रु.
  (संकलन / संपादन : डॉ. आशा सावदेकर, वामन तेलंग)
- कै. वा. ना. देशपांडे यांचे स्फुट-लेखन ३ खंड : तुलाधर, चित्रगुप्त........ ३००.०० रु. (प्रत्येकी)
  (संपादक : प्रा. राम शेवाळकर) त्रिविक्रम........ ४००.०० रु.
- युगवाणी, माडखोलकर विशेषांक १९९८ संपादन : डॉ. सुलभा हेर्लेकर........ ४०.०० रु.
- युगवाणी, कुसुमावती देशपांडे जन्म शताब्दी विशेषांक (२००४-०५)
  संपादन : डॉ. सुलभा हेर्लेकर........ ४०.०० रु.

अनुक्रमणिका



ISO 9001:2000
DNV
REGISTERED FIRM
An ISO 9001 : 2000 Company
20 YEARS OF CARE
Trust, Reliability & Quality.
The Hallmarks of a Shewalkar Property.
Shewalkars. The name that has generated an aura of abject trust and faith around itself. Shining bright in the halo of recognition by its customers - 2822 happy families & 686 commercial space owners, and over a dozen dignified corporates, who occupy real estate developed with absolute care & devotion. And a mission- To give nothing but the best.
An ISO 9001 : 2000 Company.
shewalkar
developers limited
Laxmi Bhavan Square, W.H.C. Road, Dharampeth, Nagpur-440 010.
Tel. : 2543807, 2543785, 2531777. Fax : +91-712-2538129.
e-mail : shewalkr_ngp@sancharnet.in